दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२६० शनिवार दि.३० मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-260 Saturday, Dt.30 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4


# आंदोलन अटळ, पण चर्चेचे दरवाजे खुले

## अंतरवाली सराटीत जरांगे-विखे बैठक, सरकारवर पुन्हा दबाव

बीड /प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या आज पासून सुरू होणाऱ्या आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच भाजप आमदार प्रसाद लाड यांनी भेट घेत सविस्तर चर्चा केली. मराठा आरक्षण आणि सरसकट कुणबी प्रमाणपत्राच्या मागणीवरून पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, या बैठकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते.

बैठकी दरम्यान सरकारकडून आंदोलन मागे घेण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, मनोज जरांगे पाटील यांनी सरकारने केवळ आश्वासनांवर वेळ घालवला, आता ठोस निर्णयाशिवाय माघार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेतल्याची माहिती समोर आली आहे. दुसरीकडे विखे पाटील यांनी सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत सकारात्मक असून अनेक नोंदी शोधण्याचे आणि प्रमाणपत्र वितरणाचे काम सुरू असल्याचे सांगत संवादातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेल्या काही महिन्यांपासून आंदोलनाची तीव्रता कमी




झाली असली तरी, उद्यापासून प्रस्तावित आमरण उपोषणामुळे हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जरांगे पाटील यांनी यावेळी आंदोलन पूर्वीपेक्षा अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. सरकारने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी न झाल्याचा आरोप करत त्यांनी मराठा समाजामध्ये नाराजी वाढत असल्याचे म्हटले.

बैठकीनंतर अधिकृत तोडगा जाहीर झाला नसला तरी, चर्चेचे दरवाजे खुले ठेवण्यात आले असल्याचे संकेत मिळत आहेत. मात्र, जरांगे पाटील आपल्या आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम असल्याने सरकारसमोर नवे राजकीय आणि सामाजिक आव्हान उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, उद्याच्या आंदोलनासाठी अंतरवाली सराटीत मोठ्या प्रमाणात समाजबांधव दाखल होण्यास सुरुवात झाली असून प्रशासनानेही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने तयारी वाढवली आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी येण्याची चिन्हे दिसत आहेत.

# माजलगावात राजमाता अहिल्याबाई होळकर जन्मोत्सवाचे आयोजन

## पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण

माजलगाव । प्रतिनिधी

सकल धनगर समाज, माजलगाव विधानसभा मतदारसंघ यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम दिनांक ३१ मे रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक येथे पिवळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने होणार असून हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता समाजातील महिलांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महाआरती तसेच अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजातील महिला भगिनींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून भाजपा विधानसभा प्रमुख माधव निर्मळ हे उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या




अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले हे राहणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश गवते, सरपंच राज अर्जुन, सरपंच नारायण भले उपस्थित राहतील.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून बंडू खांडेकर, ज्ञानेश्वर सरवदे, यशवंत गायके, अण्णासाहेब वगरे, अशोकराव डोणे, बबनराव सरवदे, भगवानराव सरवदे, ॲड. विनायकराव लवटे, सुभाषराव गडदे, डॉ. भारत वाघमोडे, लक्ष्मीकांत सोन्नर, नारायण सातपुते, मुक्तीराम आबुज, संजय धरपडे, बाळासाहेब सोनसळे, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे, विशाल देवकते, संपतराव हराळ, भागवत गायकवाड ,ॲड.जयराम सजगणे, रणजीत रुपनर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या जन्मोत्सव सोहळ्यास माजलगाव मतदार संघातील नागरिकांनी व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजक विलास नेमाने, संतोष देवकते, जयंत अध्यक्ष अशोक चोरमले, रामेश्वर शिंदे, रणजीत चोरमले, सुरेश देवकते, आप्पासाहेब तायडे, प्रथमेश बोरखडे, अशोक देवकते, अर्जुन भुतकर, हनुमान गावडे, हरिचंद्र कुंडकर, गणेश हजारे, दत्ता मुळे, दिगंबर घुमरे, अनिल आवाड, अर्जुन दिवटे, सुभाष गवळी, अशोक गवळी, हनुमान बाबरे, रामेश्वर काळे, सचिन वगरे, रामेश्वर सरवदे यांनी केले आहे.

# शिवसैनिकांनो जिंकण्याच्या शर्यतीत उतरा, तुम्हाला जिंकवण्याची जबाबदारी पक्षाची- खा. डॉ. श्रीकांत शिंदे

## बीड-माजलगाव मतदारसंघातील शिवसंवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद!





बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्रासह मराठवाड्यात उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे साहेबांच्या कामाची सकारात्मक प्रतिमा निर्माण झालेली आहे. बीड जिल्ह्यात शिवसेनेला आगामी काळात मोठी संधी आहे. लोकांच्या मनात आजही शिवसेना आहे. त्यामुळे तळागाळात जाऊन काम करा, स्वतःची ताकद निर्माण करा. आपण मागणारे नाही तर देणारे आहोत. ज्याच्याकडे ताकद आहे, त्याला पक्ष नक्की ताकद देतो. शिवसैनिकांनो, जिंकण्याच्या शर्यतीत उतरा; तुम्हाला जिंकवण्याची जबाबदारी पक्षाची आहे, असे दमदार प्रतिपादन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. बीड-माजलगाव मतदारसंघातील शिवसंवाद बैठकीत ते बोलत होते. राज्यभर सुरू असलेल्या शिवसंवाद दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बीडमधील हॉटेल निलकमल येथे ही महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत तळागाळातील शिवसैनिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत पक्ष संघटन मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी बोलताना खा. शिंदे यांनी बीडमधील शिवसेनेच्या मतदानाचा उल्लेख करत,मागील निवडणुकांमध्ये बीड मतदारसंघात शिवसेनेला चांगले मतदान झाले आहे. त्यामुळेच पक्षाने मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याकडे बीड जिल्ह्याची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. पक्षाचे वरिष्ठ नेते बीडमध्ये सक्रियपणे काम करत आहेत, हीच पक्षाने दिलेली ताकद आहे, असे सांगितले. बैठकीत विधानसभा

पान ३ वर...

### अनिलदादांकडे पक्षाचे विशेष लक्ष आहे - खा. डॉ. श्रीकांत शिंदे

बैठकीदरम्यान शिवसैनिकांना संबोधित करताना खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्याबाबत महत्त्वपूर्ण वक्तव्य केले. अनिलदादा जगताप यांच्याकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांसह पक्षाचे विशेष लक्ष आहे म्हणूनच शिवसेनेचे वरिष्ठ नेते मंत्री भरतशेठ गोगावले, शेजारच्या मतदार संघातील खा. संदीपन भूमरे, आमदार हेमंत पाटील आणि आमच्या ठाण्याचे मनोजजी शिंदे आम्ही संपर्कप्रमुख पदी दिले आहेत. यामुळे अनिलदादांकडे संपूर्ण पक्षाचे पूर्ण लक्ष आहे. कोणतीही चिंता करू नका. पक्ष संघटना बळकट करण्यावर भर द्या. योग्य वेळी योग्य न्याय मिळेल आणि पक्ष योग्य जबाबदारी निश्चितच सोपवेल, असे स्पष्ट आश्वासन खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिले.









# गोदावरी पात्रातून होणारी अवैध वाळू वाहतूक पकडली



**३० लाखांचे हायवा वाहन जप्त**

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव ग्रामीण पोलिसांनी अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरुद्ध मोठी कारवाई करत ३० लाखांहून अधिक रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक २९ मे २०२६ रोजी माजलगाव ग्रामीण पोलिसांना गोदावरी नदी पात्रातून (मौजे हिवरा शिवार) अवैधरित्या वाळू उपसा करून ती हायवा वाहनाद्वारे

पान ३ वर...




## संपादकीय....

# इंधन संकटाने महाराष्ट्र वेठीस, सरकार झोपेत

ग्रामीण भागाला प्राधान्याने डिझेल पुरवठा, साठेबाजीवर कठोर कारवाई आणि पुरवठा साखळीतील अडथळे दूर करणे आवश्यक आहे. अन्यथा पेट्रोल पंपांवरील रांगा उद्याच्या जनआक्रोशात परिवर्तित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवरच असेल.

ग्रामीण भागाला प्राधान्याने डिझेल पुरवठा, साठेबाजीवर कठोर कारवाई आणि पुरवठा साखळीतील अडथळे दूर करणे आवश्यक आहे. अन्यथा पेट्रोल पंपांवरील रांगा उद्याच्या जनआक्रोशात परिवर्तित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवरच असेल.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पेट्रोल-डिझेलच्या टंचाईने गंभीर स्वरूप धारण केले. अनेक जिल्ह्यांतील पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांना डिझेलसाठी तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे, तर अनेक पंपांवर 'डिझेल उपलब्ध नाही' अशा पाट्या झळकत आहेत. खरीप हंगामाच्या उंबरठ्यावर निर्माण झालेली ही परिस्थिती ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. मात्र सरकारकडून या संकटाची तीव्रता मान्य करण्याऐवजी 'टंचाई नाही' असा खोटा दावा करून वास्तव झाकण्याचा प्रयत्न सुरू आहे.

सरकारचे दावे फोल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने राज्यात इंधन टंचाई नसल्याचे सांगत आहेत. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र वेगळे आहे. जर परिस्थिती नियंत्रणात असेल, तर पेट्रोल पंपांवर मध्यरात्रीपासून रांगा का लागत आहेत? शेतकरी डिझेलच्या शोधात गावोगाव का फिरत आहेत? ट्रॅक्टर, पंपसेट आणि शेती मशागतीची यंत्रे ठप्प का पडत आहेत? गेल्या आठ दिवसांत पेट्रोल, डिझेलच्या दरात प्रति लिटर ८ रुपये आणि सीएनजीच्या दरात प्रति किलो ५ रुपयांपेक्षा अधिकची वाढ झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरवाढीमुळे खाद्यपदार्थांच्या किमतीत अगोदरच वाढ झालेली आहे. त्यामुळे सरकारच्या दाव्यांपेक्षा जमिनीवरील वास्तव खूप गंभीर आहे.

प्रसिद्धी स्टंट

पंतप्रधानांनी इंधनाचा वापर जपून करण्याचे सांगितल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी एक दिवस बुलेटने फिरण्याची स्टंटबाजी केली. पण त्या बुलेटस्वारीचे फोटो आणि व्हिडीओ शूट करण्यासाठी ८-१० कॅमेरे आणि गाड्या वापरल्या जात होत्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एत कार वापरायला सुरुवात केली, पण त्यांच्या मागेपुढे डिझेल, पेट्रोलवर चालणाऱ्या किमान डझनभर गाड्या असतात. सत्ताधारी पक्षाचे बहुतांश मंत्री आणि आमदार लँड क्रुझर, रेंज रोव्हर, डिफेंडर अशा गाड्या वापरतात. ज्या एक लिटरमध्ये फक्त ३ किलोमीटरच्या आसपास चालतात. प्रचाराची नौटंकी सोडली तर सत्ताधारी पक्षाकडून उधळपट्टी सुरू आहे.

दिव्याखाली अंधार

राज्याचे मंत्री गिरीष महाजन यांनी या परिस्थितीस 'काळाबाजार' कारणीभूत असल्याचे सांगत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या स्वत:च्या जिल्ह्यात तापी नदीपात्रात हजारो जेसीबी पोकलेन आणि डंपर दिवसरात्र वाळू उपसा आणि वाहतूक करत आहेत. त्यांना हे डिझेल कुठून मिळत आहे. काळ्या बाजारातून? काळ्या बाजारामुळे कृत्रिम टंचाई निर्माण होत असेल, तर ती रोखण्याची जबाबदारी सरकारची नाही का? साठेबाजी होत असेल तर प्रशासन काय करत होते? हे सर्व माफिया सत्ताधारी पक्षाच्या जवळचे आहेत. त्यामुळे त्यांना सरकारी आशीर्वादासोबत टंचाईच्या काळात डिझेलचा सुरळीत पुरवठाही सुरू आहे. हातात कॅन घेऊन दिवसभर पंपावर उभ्या असणाऱ्या शेतकऱ्यांना काळा बाजार करतात असे म्हणणाऱ्या गिरीष महाजनांच्या जिल्ह्यात तापी नदीतून अवैधपणे जी रेतीची लूट सुरू आहे त्यासाठी लागणारे डिझेल काळ्या मार्गाने येती की गोऱ्या मार्गाने यावर कधी चकार शब्द काढला नाही.

प्रशासन आणि माफियांची युती

राज्यात सगळीकडे अवैध रेती उत्खनन करणारे डंपर, जेसीबी आणि पोकलेन मशीन दिवस-रात्र सुरू आहेत. त्यांना रोज हजारो लिटर डिझेल मिळत आहे. जर पुरवठा कमी असेल, तर हा इंधन पुरवठा कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? अवैध रेती उत्खननाचा पर्यावरणावरही गंभीर परिणाम होत आहे. नदीपात्रांची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून भूजल पातळी खालावत आहे. गावांचे नैसर्गिक संतुलन बिघडत आहे. तरीही प्रशासनाकडून कठोर कारवाई होताना दिसत नाही.

---

# शांत,संयमी व अभ्यासू आदर्श मुख्याध्यापक

# श्री.सुनील प्रल्हादराव काकडे

आष्टी /प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात तब्बल तीन दशकांहून अधिक काळ निष्ठा, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी जपत कार्य करणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडी, केंद्र बेलगाव, ता. आष्टी, जि. बीड येथील आदर्श मुख्याध्यापक श्री. सुनील प्रल्हादराव काकडे हे ५८ व्या वर्षात पदार्पण करत असून त्यांच्या सेवापूर्ती निमित्त भव्य गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ३१ मे २०२६ रोजी मोरेश्वर मंगल कार्यालय, नगर-बीड रोड, आष्टी येथे हा सेवापूर्ती कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न होणार असून शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार, विद्यार्थी व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

श्री. सुनील प्रल्हादराव काकडे यांचा जन्म ५ जून १९६८ रोजी किन्ही, ता. आष्टी, जि. बीड येथे एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आई-वडील अत्यंत कष्टाळू शेतकरी होते. प्रतिकूल परिस्थिती असतानाही आपल्या मुलांनी उच्च शिक्षण घेऊन आयुष्यात यशस्वी व्हावे, या ध्येयाने त्यांनी आयुष्यभर मेहनत घेतली. या संस्कारातूनच श्री. काकडे यांच्यामध्ये मेहनत, जिद्द, शिस्त आणि समाजसेवेची भावना निर्माण झाली.



त्यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता पहिली ते सहावीपर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किन्ही येथे झाले. त्यानंतर इयत्ता सातवी ते दहावीपर्यंतचे माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची, आष्टी येथे पूर्ण केले. पुढे त्यांनी बीड येथील बलभीम महाविद्यालयातून अकरावी व बारावीचे शिक्षण घेतले. शिक्षण क्षेत्रात कार्य करण्याची जिद्द असल्यामुळे त्यांनी शासकीय अध्यापक विद्यालय, अंबाजोगाई येथून डी.एड. शिक्षण सन १९८८ मध्ये यशस्वीरित्या पूर्ण केले.

शिक्षक होण्याचे स्वप्न साकार करत श्री. काकडे यांची ५ सप्टेंबर १९८८ रोजी शासकीय सेवेत शिक्षक म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी शिक्षण क्षेत्रात अखंड सेवा बजावत हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देण्याचे कार्य केले. त्यांच्या कार्यात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला विशेष महत्त्व देण्यात आले. शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त, सामाजिक मूल्ये आणि गुणवत्ता वाढीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

त्यांच्या सेवाप्रवासाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हसोबाचीवाडी, ता. आष्टी, जि. बीड येथून झाली. सन १९८८ ते १९८९ या कालावधीत त्यांनी येथे एक वर्ष सेवा बजावली. त्यानंतर सन १९८९ ते १९९१ दरम्यान जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा जामगाव येथे तीन वर्ष चार महिने विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. पुढे त्यांची प्रशासकीय बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाहेगाव, ता. गेवराई येथे झाली. येथे सन १९९१ ते १९९८ या सात वर्ष सहा महिन्यांच्या कालावधीत त्यांनी उत्कृष्ट अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तावाढ घडवून आणली.

सन १९९८ ते २००८ या दहा वर्षांच्या कालावधीत श्री. काकडे यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालय, आष्टी येथे प्रशासकीय जबाबदारी सांभाळली. या काळात शिक्षण व्यवस्थापन, शैक्षणिक नियोजन, शिक्षकांशी समन्वय आणि प्रशासनिक कामकाजात त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यानंतर सन २००८ ते २०१६ या आठ वर्षांच्या कालावधीत त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किन्ही येथे सेवा बजावत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर घातली.

सन २०१६ पासून ते सध्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडी, केंद्र बेलगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या शाळेत त्यांनी तब्बल दहा वर्षे सेवा बजावत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसह शिस्त, शाळेचा विकास, शैक्षणिक उपक्रम आणि पालक-शाळा संवाद मजबूत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वामुळे शाळेला एक वेगळी ओळख मिळाल्याचे शिक्षक व पालक सांगतात.

श्री. सुनील काकडे यांची एकूण सेवा ३८ वर्षे ९ महिने इतकी प्रदीर्घ आणि प्रेरणादायी राहिली आहे. त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्याची दखल घेत जिल्हा परिषद बीडमार्फत त्यांना सन १९९४ मध्ये गटशिक्षणाधिकारी कार्यालय गेवराई यांच्या माध्यमातून एक ज्यादा वेतनवाढ देण्यात आली. त्यानंतर पुन्हा सन २००२ मध्ये गटशिक्षणाधिकारी कार्यालय आष्टी यांच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्याबद्दल दुसरी ज्यादा वेतनवाढ प्रदान करण्यात आली. याशिवाय स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कडा यांच्या वतीने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

शैक्षणिक सेवेसोबतच त्यांनी आपले कुटुंबही आदर्श पद्धतीने घडविले आहे. त्यांना एक मुलगा व एक मुलगी असून दोघेही उच्चशिक्षित आयटी इंजिनिअर आहेत. मुलगा किशोर काकडे हा आयटी इंजिनिअर असून मुलगी अश्विनी काकडे हीदेखील आयटी इंजिनिअर आहे. त्यांचे जावई श्री. स्वप्नील शिपलकर हेही आयटी इंजिनिअर असून संपूर्ण कुटुंब उच्चशिक्षित व प्रगतशील आहे. सुनबाई एम.कॉम. शिक्षित असून बँकेत कार्यरत आहेत. सरांना एक नातू असून संपूर्ण कुटुंब पुणे येथे वास्तव्यास आहे.

श्री. काकडे यांच्या यशस्वी आयुष्याच्या प्रवासात त्यांच्या अर्धांगिनी सौ. महानंदा काकडे यांचे योगदानही तितकेच मोलाचे आहे. त्यांनी आयुष्यभर शेती, घरकाम आणि मुलांच्या शिक्षणासाठी सातत्याने परिश्रम घेत कुटुंबाला मजबूत आधार दिला. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत मुलांना उच्च शिक्षणासाठी प्रेरित केले. त्यामुळेच आज काकडे कुटुंब सुखी, समृद्ध आणि सुसंस्कृत जीवन जगताना दिसत आहे.

श्री. सुनील प्रल्हादराव काकडे यांचा सेवानिवृत्ती दिनांक ३० जून २०२६ असून त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त शिक्षक, विद्यार्थी, मित्रपरिवार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. शिक्षण क्षेत्रात समर्पण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांविषयी अपार प्रेम जपणाऱ्या या आदर्श मुख्याध्यापकांचा सेवाप्रवास अनेक शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

शब्दांकन...
**- राजेंद्र लाड,आष्टी**
(९४२३१७०८८५)

---

# आदर्श शिक्षक,कर्तव्यनिष्ठ मुख्याध्यापक

# श्री.सोपान मुरलीधर काकडे

आष्टी - प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात आपल्या प्रामाणिक, निष्ठावान आणि विद्यार्थीहित जपणाऱ्या कार्यामुळे विशेष ओळख निर्माण करणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोहिणीचे आदर्श मुख्याध्यापक श्री. सोपान मुरलीधर काकडे हे दिनांक ३१ मे २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. तब्बल तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत शिक्षण सेवेला वाहून घेतलेले आयुष्य आज अनेक शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

श्री. सोपान मुरलीधर काकडे यांचा जन्म आष्टी तालुक्यातील किन्ही (काकड्याची), जि. बीड या गावात एका सुसंस्कृत व कष्टाळू कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांच्यावर शिक्षण, संस्कार आणि शिस्त यांचे बाळकडू मिळाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किन्ही येथे झाले. ग्रामीण वातावरणात शिक्षण घेत असताना त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले आणि पुढे शिक्षक होण्याचा ध्यास घेतला.

यानंतर त्यांनी इयत्ता आठवी ते दहावीचे माध्यमिक शिक्षण पद्मावती विद्यालय डोईठाण, ता. आष्टी येथे पूर्ण केले. शिक्षणातील सातत्य आणि अभ्यासू वृत्तीमुळे त्यांनी पुढील उच्च शिक्षण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी येथे घेतले. शिक्षक बनण्याची प्रबळ इच्छा असल्याने त्यांनी शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी येथे डी.एड.चे शिक्षण पूर्ण करून शिक्षण क्षेत्रात प्रवेश केला.

दिनांक ७ ऑगस्ट १९९५ रोजी त्यांची प्रथम नियुक्ती जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बेलगाव, ता. आष्टी येथे झाली. पहिल्याच नियुक्तीपासून त्यांनी विद्यार्थीकेंद्री शिक्षण, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि गुणवत्तापूर्ण अध्यापन यावर भर दिला. बेलगाव येथे त्यांनी सन २०१२ पर्यंत अत्यंत प्रामाणिकपणे शैक्षणिक सेवा बजावली. त्यांच्या कार्यकाळात अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती केली तसेच शाळेचा शैक्षणिक दर्जाही उंचावला.



त्यानंतर त्यांची प्रशासकीय बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेलारवाडी, केंद्र खिळद येथे झाली. सन २०१२ ते २०१९ या कालावधीत त्यांनी तेथेही आपल्या कार्याचा ठसा उमटवला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे, पालकांशी सुसंवाद ठेवणे, शाळेतील उपक्रम राबविणे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणणे यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

सन २०१९ मध्ये त्यांची पुन्हा प्रशासकीय बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोहिणी, केंद्र बेलगाव येथे मुख्याध्यापक म्हणून झाली. मुख्याध्यापक पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची उपस्थिती, स्वच्छता, सांस्कृतिक उपक्रम, क्रीडा आणि सामाजिक मूल्ये यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली कोहिणी शाळेने अनेक स्तरांवर उल्लेखनीय प्रगती साधली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून शिक्षणाची आवड निर्माण करण्याचे कार्य त्यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.

श्री. काकडे सर हे केवळ शिक्षक किंवा मुख्याध्यापक नसून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक, पालकांसाठी विश्वासू व्यक्तिमत्त्व आणि सहकारी शिक्षकांसाठी प्रेरणास्थान म्हणून ओळखले जातात. शांत, संयमी आणि अभ्यासू स्वभावामुळे त्यांनी सर्वांमध्ये वेगळी छाप निर्माण केली. शिक्षण क्षेत्रात कार्य करताना त्यांनी कधीही प्रसिद्धीचा हव्यास न धरता निःस्वार्थ वृत्तीने सेवा दिली.

त्यांचे कौटुंबिक जीवनही तितकेच आदर्श आहे. त्यांच्या परिवारात आई-वडील,एक बहीण, एक भाऊ, पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा सुशिक्षित आणि सुसंस्कृत परिवार आहे. वडिल मुरलीधर कृष्णा काकडे व आई सौ. मुक्ताबाई मुरलीधर काकडे असून त्यांचे भाऊ ज्ञानदेव मुरलीधर काकडे हे भारतीय सैन्यात कॅप्टन या पदावर कार्यरत होते व सध्या ते सेवानिवृत्त झालेले आहेत. देशसेवेची परंपरा त्यांच्या कुटुंबात दिसून येते.

त्यांचा मोठा मुलगा राहुल सोपान काकडे हे बीड येथे पोलीस विभागात कार्यरत असून समाजसेवेचे कार्य करत आहे. तर दुसरा मुलगा सौरभ सोपान काकडे कुस्ती क्षेत्रात महाराष्ट्र चॅम्पियन ठरलेला असून सध्या पुणे येथील आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल येथे वस्ताद काकासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर सराव करत आहे. त्यांच्या मयुरी सोपान काकडे या कन्येने डी. फार्मसी व डीएमएलटीचे शिक्षण पूर्ण केले असून तीही उच्चशिक्षित आहे. काकडे सरांच्या सौभाग्यवती श्रीमती पुष्पा काकडे या आदर्श गृहिणी, आदर्श माता असून मुलांना घडविण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा असून त्यासाठी त्यांनी खूप कष्ट, मेहनत घेतलेली आहे. त्यामुळे काकडे कुटुंब हे शिक्षण, संस्कार आणि कर्तृत्व यांचा सुंदर संगम मानले जाते.

श्री. सोपान मुरलीधर काकडे यांनी आपल्या संपूर्ण सेवाकाळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात त्यांनी ज्ञानाचा प्रकाश पेरला. शिक्षक म्हणून त्यांनी जपलेली मूल्ये, शिस्त, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांविषयी असलेली आत्मीयता ही कायम स्मरणात राहणारी आहे. दिनांक ३१ मे २०२६ रोजी ते शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत असले तरी त्यांनी केलेले कार्य, त्यांची शिक्षणसेवा आणि त्यांनी घडवलेली विद्यार्थ्यांची पिढी हीच त्यांच्या आयुष्याची खरी कमाई ठरणार आहे. त्यांच्या पुढील आयुष्यास निरोगी, आनंदी आणि दीर्घायुषी वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. कर्तव्यनिष्ठ, अभ्यासू, आदर्श आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी सदैव झटणारे मुख्याध्यापक म्हणून श्री. सोपान मुरलीधर काकडे यांचे नाव शिक्षण क्षेत्रात सदैव आदराने घेतले जाईल.

शब्दांकन...
- राजेंद्र लाड,आष्टी

---

## कडक पण प्रेमळ,रागावणारे पण योग्य मार्ग दाखवणारे

# स्पष्ट बोलणारे पण विद्यार्थ्यांसाठी धडपडणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री.प्रा.डॉ.शाम सांगळे सर...!

आष्टी /प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाचे ज्येष्ठ, अभ्यासू, शिस्तप्रिय, स्पष्टवक्ते आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध राहिलेले ज्येष्ठ ग्रंथपाल प्रा. डॉ. शाम तुकाराम सांगळे यांची प्रदीर्घ आणि उल्लेखनीय शैक्षणिक सेवा आता पूर्णत्वास येत आहे. जवळपास चार दशकांहून अधिक काळ त्यांनी शिक्षण, ज्ञान, संस्कार आणि विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी निःस्वार्थपणे कार्य करत आपल्या सेवेतून अनेकांच्या आयुष्यात परिवर्तन घडवले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने कडा परिसरासह शैक्षणिक क्षेत्रात त्यांच्या कार्याचा गौरव होत असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंवर चर्चा होत आहे.

प्रा. डॉ. शाम तुकाराम सांगळे यांचे व्यक्तिमत्त्व हे प्रथमदर्शनी कडक, शिस्तप्रिय आणि स्पष्टवक्ते असे वाटणारे असले तरी त्यांच्या अंतःकरणात विद्यार्थ्यांविषयी अपार प्रेम, संवेदनशीलता आणि त्यांच्या प्रगतीची खरी तळमळ कायम होती. चूक असेल तर स्पष्ट सांगायचे आणि योग्य असेल तर मनापासून कौतुक करायचे हा त्यांचा स्वभाव अनेकांना प्रेरणा देणारा ठरला. बोलण्यात कोणताही दिखावा नव्हता, शब्दांमध्ये कृत्रिम गोडवा नव्हता, पण प्रामाणिकपणा आणि सत्यतेची ताकद होती. त्यामुळे काहींना ते सुरुवातीला कठोर वाटत असले तरी जवळून ओळख झाल्यावर त्यांच्या मनातील माणुसकी आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम जाणवत असे.



कडा परिसरातील सामान्य परिस्थितीतून शिक्षणाचा प्रवास सुरू करत त्यांनी संघर्षातून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवले. लहानपणापासून शिक्षणाची ओढ, वाचनाची आवड आणि ज्ञानार्जनाची जिद्द यामुळे त्यांनी परिस्थितीशी दोन हात करत उच्च शिक्षण प्राप्त केले. आर्थिक अडचणी, ग्रामीण भागातील मर्यादा आणि अनेक संकटे यांचा सामना करत त्यांनी स्वतःला सक्षम बनवले. शिक्षण हेच जीवन बदलण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे, या विश्वासातून त्यांनी आयुष्यभर शिक्षणाची मशाल प्रज्वलित ठेवली. ग्रंथालयशास्त्र विषयात उच्च शिक्षण घेत त्यांनी महाविद्यालयीन सेवेत प्रवेश केला आणि आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून रुजू झाल्यानंतर त्यांनी ग्रंथालयाला केवळ पुस्तक ठेवण्याची जागा न मानता ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र बनवले. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात यावे, पुस्तके वाचावीत, स्पर्धा परीक्षा, संशोधन आणि शैक्षणिक अभ्यासासाठी आवश्यक संदर्भ साहित्य वापरावे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

महाविद्यालयीन ग्रंथालयात त्यांनी शिस्त, नियोजन आणि कार्यक्षमतेचा आदर्श निर्माण केला. कोणते पुस्तक कुठे आहे, कोणत्या विद्यार्थ्याला कोणते पुस्तक आवश्यक आहे, अभ्यासक्रमानुसार कोणते साहित्य महत्त्वाचे आहे, स्पर्धा परीक्षांसाठी कोणती पुस्तके उपयोगी पडतील, याचे अचूक मार्गदर्शन ते विद्यार्थ्यांना करत असत. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनामुळे एमपीएससी, यूपीएससी, पोलीस भरती, शिक्षक भरती, बँकिंग आणि इतर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवले असल्याचे सांगितले जाते.

प्रा. डॉ. शाम सांगळे यांना वाचनाची आणि वर्तमानपत्रांच्या अभ्यासाची विशेष आवड होती. सकाळी लवकर उठून वर्तमानपत्रांचा अभ्यास करणे, विविध विषयांवरील घडामोडी जाणून घेणे आणि त्यातून समाज, राजकारण, शिक्षण, अर्थव्यवस्था, साहित्य, संस्कृती या विषयांवर स्वतःची स्पष्ट भूमिका मांडणे, ही त्यांची खास शैली होती. विद्यार्थ्यांनी फक्त पाठ्यपुस्तकांपुरते शिक्षण मर्यादित न ठेवता वर्तमान घडामोडी, संदर्भ साहित्य आणि विविध विचारवंतांचे लेखन वाचावे, असे ते वारंवार सांगत असत. महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमध्ये त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्याकडे एखादा विद्यार्थी अडचण घेऊन गेला तर तो रिकाम्या हाताने परत येत नसे. कधी मार्गदर्शन, कधी प्रेरणा, कधी कठोर शब्दांत समज आणि कधी आवश्यक ती मदत करून विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवावे, वेळेचे नियोजन करावे, मेहनत घ्यावी आणि प्रामाणिकपणे आयुष्य जगावे, हा संदेश त्यांनी आयुष्यभर दिला.

त्यांच्या स्वभावातील स्पष्टता ही अनेकदा चर्चेचा विषय ठरली. एखादी गोष्ट चुकीची वाटली तर ती स्पष्ट शब्दांत सांगण्याची त्यांची पद्धत होती. त्यामुळे काही वेळा गैरसमजही झाले, मतभेदही निर्माण झाले; मात्र त्यांनी कधीही तत्त्वांशी तडजोड केली नाही. व्यक्तीपेक्षा तत्त्व मोठे आणि कामात प्रामाणिकपणा महत्त्वाचा, हा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे अनेकांनी त्यांचा आदर केला आणि त्यांना मार्गदर्शक मानले.प्रा. डॉ. शाम सांगळे यांचे सामाजिक भानही तितकेच मजबूत होते. शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक, वैचारिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्येही त्यांचा सहभाग राहिला. समाजात शिक्षणाची जागृती निर्माण व्हावी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे, वाचन संस्कृती वाढावी, युवकांनी चुकीच्या सवयींपासून दूर राहून अभ्यास आणि सकारात्मक विचार स्वीकारावेत, यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. पत्रकार, साहित्यिक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील व्यक्तींशी त्यांनी संवादाचे जिव्हाळ्याचे संबंध ठेवले. विचारांची देवाणघेवाण, चर्चा आणि सामाजिक प्रश्नांवरील चिकित्सक दृष्टिकोन यामुळे ते नेहमी चर्चेत राहिले. त्यांच्याकडे असलेली माहितीची संपन्नता, वाचनातून आलेले ज्ञान आणि स्पष्ट मांडणी यामुळे अनेकजण त्यांच्याकडे मार्गदर्शनासाठी येत असत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे साधेपणा. उच्च शिक्षण, मोठा अनुभव आणि समाजात मानाचे स्थान असूनही त्यांनी कधी अहंकार जवळ केला नाही. साधे राहणीमान, शिस्तबद्ध जीवनशैली, वेळेचे काटेकोर नियोजन आणि कामाप्रती निष्ठा यामुळे त्यांनी अनेकांसमोर आदर्श निर्माण केला. विद्यार्थ्यांनी फक्त पदवी मिळवण्यावर न थांबता व्यक्तिमत्त्व घडवावे, विचार विकसित करावेत आणि समाजासाठी उपयोगी माणूस व्हावे, असे ते कायम सांगत असत.

आज त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, माजी विद्यार्थी, मित्रपरिवार आणि सामाजिक क्षेत्रातील अनेकजण त्यांच्या कार्याचा गौरव करत आहेत. अनेक विद्यार्थ्यांच्या आठवणींमध्ये कडक पण प्रेमळ, रागावणारे पण योग्य मार्ग दाखवणारे, स्पष्ट बोलणारे पण विद्यार्थ्यांसाठी धडपडणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व कायम जिवंत राहणार आहे.

सेवानिवृत्ती ही केवळ नोकरीचा शेवट नसून अनुभवांच्या नव्या पर्वाची सुरुवात असते. प्रा. डॉ. शाम तुकाराम सांगळे यांचे ज्ञान, अनुभव, वाचन आणि वैचारिक भूमिका यांचा लाभ समाजाला पुढेही मिळत राहावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाची गोडी निर्माण करणारे, शिस्तीची जाणीव देणारे, स्पष्ट विचारांची शिकवण देणारे आणि ज्ञानाचा दीप सतत प्रज्वलित ठेवणारे प्रा. डॉ. शाम तुकाराम सांगळे हे शिक्षण क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून कायम स्मरणात राहतील.

शब्दांकन...
- राजेंद्र लाड,आष्टी

## पान १ वरुन...

**शिवसैनिकांनो जिंकण्याच्या ...**

क्षेत्रनिहाय संघटनात्मक आढावा, तालुकानिहाय माहिती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे नियोजन, संभाव्य उमेदवारांबाबत चर्चा, नेमणुका, बी.एल.ए. यादी आणि प्रशिक्षण यांसह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धनुष्यबाण अधिक मजबूत करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर देण्यात आला.

दरम्यान बैठकीत विधानसभा क्षेत्रनिहाय संघटनात्मक आढावा, तालुकानिहाय माहिती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे नियोजन, संभाव्य उमेदवारांबाबत चर्चा, एस.ई.ओ. नेमणुका, बी.एल.ए. यादी आणि प्रशिक्षण यांसह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. दरम्यान, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड-माजलगाव मतदारसंघाचा सर्वंकष कार्यअहवाल सादर केला. यावेळी त्यांनी पदाधिकारी, शिवसैनिकांचे संघटनात्मक काम, स्थानिक विकासाचे मुद्दे तसेच आगामी राजकीय परिस्थितीबाबत आपले मत मांडले.

## पान १ वरुन...

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धनुष्यबाण अधिक मजबूत करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर देण्यात आला.

या बैठकीस रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री तथा बीड जिल्हा संपर्कमंत्री भरतशेठ गोगावले, खा. संदीपान भुमरे पाटील, आमदार हेमंत पाटील, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, माजी खासदार आनंदजी परांजपे, शिवसेना सचिव संजयजी माशीलकर, संजय लाखे, मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन, बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे, शिवसेना उपनेत्या संगीता ठोंबरे,विधानसभा संपर्काप्रमुख बाप्पुसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्यासह विविध अंगीकृत संघटनांचे अजीमाजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवा सेना, शेतकरी सेना, अल्पसंख्यांक आघाडी, ओबीसी व्हीजेएनटी सेल, डॉक्टर सेल, विधी सेल, वाहतूक सेना, शिव उद्योग सेना, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

**गोदावरी पात्रातून....**

## पान १ वरुन...

वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने सकाळी ७:०० वाजता सापळा रचला आणि छापा टाकला.

३० लाखांचा मुद्देमाल जप्त

या कारवाईत पोलिसांनी एक 'भारत बेंज' हायवा वाहन (किंमत सुमारे ३० लाख रुपये) आणि ६ ब्रास वाळू (किंमत ३६ हजार रुपये) असा एकूण ३० लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल दोन पंचांसमक्ष जप्त केला.या प्रकरणी वाळू वाहतूक करणाऱ्या चालकावर, ज्याचे नाव तुकाराम कचरुबा आव्हाड (रा. नित्रुड, ता. माजलगाव) असे आहे, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय दंड संहिता आणि संबंधित कायद्यांन्वये ही कारवाई करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

सदर कारवाईमध्ये परि. सहा. पोलीस अधीक्षक राहुल कुमार, पोउपनि राठोड, पोह. राऊत, पोअ. बाबरे आणि पोअ. चव्हाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### बीड जिल्हा माहिती कार्यालयातील वरिष्ठ लिपीक

# बेबीसरोज अंबिलवादे यांच्या शासकीय सेवेची कार्यपुर्ती ते सेवा...!

माझी शासकीय नौकरीची सुरुवात दि. ४ ऑक्टोबर १९८९ रोजी झाली. मी प्रथमच घराचा उबंरा ओलांडला आणि शासकीय सेवेत दाखल झाले. तसे माझा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अनुभव तोकडा होता. शिक्षण म्हणजे सिंधुताई सपकाळ म्हणा किंवा बहिणाबाई चौधरी चौथी फेल.

जालना येथे माझी नियुक्ती छत्रपती संभाजीनगर येथील माहिती व जनसंपर्क कार्यालयाचे उपसंचालक स्वर्गवासी एकनाथ गायकवाड साहेब यांच्या कार्यकाळात अनुकंपातत्वावर स्वच्छक नि सेवक या पदावर नियुक्ती झाली. तसा माझा जालना येथील नौकरीचा काळ काही चांगला गेला नाही. कारण मी प्रथमच शासकीय कार्यालयाची पायरी चढले होते. त्यात माझा ग्रामीण भागातील अस्सल अडाणी वागणे राहणे असल्याने शासकीय सेवेत कसे वागायचे याबाबत मी अनभिज्ञ होते.

हळु हळु कार्यालयातील कामकाज समजुन घेतले पण कायद्याचे ज्ञान नव्हते. यामुळे त्यावेळचे जिल्हा माहिती अधिकारी यांनी माझ्याकडून घरगुती कामे साफसफाई, पाणी भरणे, इतर घरगुती कामे करुन घेतली. काही कालावधीनंतर मला काही सहका-यांनी सांगितले की तुमची नेमणुक ही कार्यालयीन कामकाजासाठी आहे. तुम्ही घरी काम करु नका. मी घरच्या कामास नकार दिला. त्यामुळे मला या अधिका-यांनी खूप त्रास दिला, या त्रासला मी जुमानले नाही. त्यामुळे अधिकारी नावाला कलंक असलेल्या त्या अधिका-याने माझ्या सेवापुस्तकात चारित्र हननाचा शेरा देखील मारला.

माझ्या काही हितचिंतकांनी मला १० वी ची परिक्षा देण्याविषची सूचना केली अन् मी १७ नंबरचा फॉर्म भरुन परीक्षेला बसले. मी रितसर परिक्षेची अनुमती घेऊन परिक्षेला जाण्यासाठी रजा मागितली पण ती मंजूर करण्यात आली नाही. मी १५ दिवस परिक्षेसाठी गेले अन् याच कालावधीत या अधिका-यांनी त्या काळचे उपसंचालक मधू काळे यांना भेटून माझी नांदेड येथे बदली केली.

नांदेड येथे जाण्यासाठी माझी उत्सुकता नव्हती, माझ्या सोबत माझ्या सासुबाई, माझी ८ वर्षाची मुलगी घेऊन एवढया दूर कसे रहावे या चिंतेत मी होते. काही लोकांनी नांदेडला तेथील लोक चांगले नाहीत, खुप त्रास देतात म्हणून भिती घातली. याच काळात आमच्या गल्लीत राहणारे अंभोरे सर हे शिक्षक होते, त्यांची भेट घेऊन मी बदलीविषयी बोलले तर त्यांनी सांगितले की तुम्ही बीनधास्त रुजु व्हा कुणी त्रास देत नाही, त्यांनी खुप समजुत घातली. त्यामुळे मला मानसिक आधार मिळाला याबद्दल मी त्यांची आभारी आहे. त्यानंतर मी १९९४ मध्ये नांदेड या कार्यालयात रुजु झाले.

जालना येथुन नांदेड येथे जाण्यासाठी रेल्वे लाईन मिटरगेज होते. मी कार्यालयात रुजु झाले. यावेळी श्री. सुरेश काचावार यांच्याकडे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून अतिरिक्त कार्यभार होता. त्यांनी राहण्याविषयी व्यवस्था विचारली तर मी रुम घेऊन राहण्याचे सांगितले. त्यांनी लगेच कार्यालयातील शिपाई पाठवून रुम पाहून दिली. मला इकडे येण्याविषयी जी भिती होती ती व्यक्त केली. कार्यालयातील सर्वच कर्मचा-यांनी आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, इथे काही भिती नाही. काळजी करु नका असे धीराचे वाक्य उच्चारल्याने मला खूपच समाधान वाटले अन् माझी नांदेडला बदली झाल्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

रुमची व्यवस्था करुन मी रजा टाकून जालन्याकडे निघाले. तेव्हा काचावार साहेब यांनी अर्ज फाडुन टाकला. दोन ते तीन दिवसानी सामान आणा काही घाई करु नका. म्हणून जाण्यास अनुमती दिली. चिखलवाडीमध्ये कार्यालय होते रुम पण तेथेच घेतली. माझ्याकडे कोषागाराचे काम आणि पाणी भरणे, कात्रणे काढणे ही कामे दिली.

येथे काम करत असतांना महानुभाव आश्रमातील प.पु.प.महंत मनोहार शास्त्री शेवलीकर हे कार्यालयात वृत्तपत्र घेऊन आले असतांना त्यांनी माझ्या पदाची, शिक्षणाची विचारपूस केली असता माझे दहावीचे दोन विषय नापास असल्याचे मी सांगितले. तेव्हा त्यांनी मुक्त विद्यापिठात १२ वी ला प्रवेश घेण्याविषयी सुचविले. त्यानुसार मी यशवंत महाविद्यालय येथे चौकशी केली असता पूर्वतयारी परीक्षेला तीनशे रुपये प्रवेश फीस असल्याची माहिती तेथील व्यवस्थापक विभूते सर यांनी दिली व अभ्यासक्रमाचे विषय,पध्दती समजावून सांगितली.

मी विद्यापीठातुन आले अन् विचार करत बसले तेव्हा श्री. काचावार साहेब यांनी विचारले काय झाले बाई ? घेतला का प्रवेश. तेव्हा मी ३००/- रुपये फीस नसल्याचे सांगितले. त्यांनी लगेच ३००/- रुपये आणि कार्यालयाची गाडी, शिपाई दिला व मला प्रवेश घेण्यास पाठविले. मला बी.ए. पास होण्याला ७ वर्ष लागले माझा इंग्रजी विषय निघत नव्हता. पुन्हा शास्त्री बाबांनी हिंदी व इंग्रजी विषय घेण्यास सांगितले व १९९५ ते २००१ मध्ये मी बी.ए.पदवी व टायपींग ३० उतीर्ण झाले.

तसेच नांदेड येथे असतांना विशेष करुन नांदेड एकजुटचे संपादक धोडोपंत विष्णूपुरीकर यांचे विशेष सहकार्य मिळाले, अजुनही मिळते. हिंगोली येथे पत्रकार संघटनेचे अध्यक्ष नंदुभाऊ तोष्णीवाल यांचे व माझी मैत्रीण माजी नगरसेविका वनिता गुजाळ यांच्या सोबत कौटुंबिक नाते होते. जालना येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष हाफिजभाई यांनीही मला वेळोवेळी सहकार्य केले. या सर्वाच्या सहकार्यामुळे मी माझ्या कार्यकाळात एक दोन अधिकारी सोडले तर सर्वच जिल्हा माहिती अधिका-यांनी मला सांभाळून घेतले.

१९९७ पासून वृत्तपत्र वाचत वाचत मी केव्हा लिखाणाकडे वळले हे पण मला कळलेच नाही. मी कविता लिहायचे या कविता नांदेड येथील विविध वृत्तपत्रात प्रसिध्द होत असत, तसेच तेथील कर्मचारीही कविता छान आहे म्हणून प्रोत्साहन द्यायचे. साहित्याची नशाच अशी आहे की, लेखकाला तो आनंद शब्दात वर्णन करता येत नाही. माझ्या कविता वाचून ब-याच रसिकांचे मला फोन यायचे तुमचा काव्यसंग्रह



आत्मलेखन
**श्रीमती बी.जी. अंबिलवादे**
वरिष्ठ लिपीक,जिल्हा माहिती कार्यालय,बीड

आहे का ? मग वाटले आपण काव्यसंग्रह प्रकाशित केला पाहिजे अन् पहिला काव्यसंग्रह मनिषा २००२ मध्ये प्रकाशित झाला. वृत्तपत्रातील लिखाण वाचून नांदेड आकाशवाणीतील अधिकारी, मिरजकर मॅडम यांचा मला त्यावेळी टेलीफोन आला. आपण चांगले लिखाण करता आकाशवाणीसाठी काही साहित्य पाठवा. तेव्हापासून दर तीन महिन्याला त्या मला काव्य वाचन, कथा, प्रासंगीक लेखाचे विषय देऊन आकाशवाणीला बोलवायच्या. मला पहिले मानधन ६००/- रुपये मिळाले तेव्हा मला गगन ठेंगणे झाले होते. अभ्यासाची आवड तर पूर्ण झाली तसेच साहित्यातही वेगळा ठसा उमटल्याने तो क्षण मी कधीही विसरु शकणार नाही. कारण ते ६००/- रुपये माझ्या कलेचे, कष्टाचे तर होतेच पण ती माझ्या लेखणाची पावती होती. यानंतर परभणी, छत्रपती संभाजीनगर, बीड या आकाशवाणी केंद्रावरही माझे विविध विषयावर साहित्याचे वाचन झाले.

मी १० वर्ष जिल्हा माहिती अधिकारी श्री. अनिल अलुरकरसाहेब यांच्या कार्यकाळात काम केले. त्यांनीही मला वेळो वेळी लेख लिहीण्यास प्रोत्साहन दिले तसेच पदोन्नतीसाठीही शिफारस केली.

२००६ मध्ये मला सर्वसाधारण सहाय्यक म्हणुन हिंगोली येथे पदोन्नती झाली. तेथील साहित्यिक विलास वैद्य, कैलास नाईक, नरेंद्र नाईक, रत्न आडे, महारुद्र घेणेकर अशा विविध साहित्यीकांशी ओळख झाली अन् आमची दर महिन्याला काव्य मैफल सजू लागली. यातुन माझ्या साहित्याला नवे धुमारे फुटु लागले. वाचन, लिखाण,साहित्याचे विविध उमक्रमाने हिंगोली हा छोटा जिल्हा मला आवडू लागला. हिंगोलीत माझे दोन पुस्तके मीच मला शोधते कथासंग्रह, २००८ मध्ये व दुसरी अवृत्ती २०१३ मध्ये प्रकाशित झाली. स्पर्शाचा गाव ललित लेख संग्रह प्रकाशित झाला. २००९ साली कळमनुरी येथील सातव महाविद्यायामध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातुन एम.सी.जे अभ्यासक्रम पूर्ण केला.

२०११ साली माझी जालना येथे बदली झाली. येथे माझा अभास हा ललीत लेखसंग्रह प्रकाशित झाला.

२०१७ साली माझी बीड येथे पदोन्नतीने दुरमुद्रकचालक या पदावर नियुक्ती झाली. लगेच माझ्याकडे अ.माहिती अधिकारी पदाचा कार्यभार सोपवण्यात आला. इथे काम करतांना सुरुवातीला थोडा त्रास झाला पण नंतर मात्र सर्व पत्रकारांचे, मैत्रीनींचे सहकार्य मिळत गेले. येथे माझा २०२० मध्ये अक्रित नावाचा कथासंग्रह प्रकाशित झाला.

बीड येथे २०२३ मध्ये मा. जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर साहेब रुजु झाले ते एकदम शांत स्वभावाचे काहीही चूक झाली तरी अधिकारी म्हणून ते कधी जोरात बोलले नाही की रागावले नाही. माझ्या बातमीत खुप चूका असायच्या पण ते शातंतेने सांगायचे. बातमी टाईप केली की वाचून घेत जा एवढेच सांगायचे. तसेच माझ्या सहकारी रेवती लाबडे, गजानन शिंदे, दिपक पवार, सावता गुंजाळ, कृष्णा डोईफोडे यांनी वेळोवेळी सहकार्य केले. लाबडे मॅडम या पुणे येथे असल्या तरी त्या अजुनही मदत करतात त्यांची मी अत्यंत आभारी आहे. माझ्या पाठीशी कोणत्याही नातेवाईकांचे पाठबळ किंवा मार्गदर्शन तसेच पाठीवर शाबासकीची थाप नसतांना मी या काटेरी वाटेतून सुगंधीत फुले वेचत इथपर्यंत पोहचले, यात माझी मुलगी मनिषा हिची मोलाची साथ असल्यामुळे मी इथपर्यंत मजल मारु शकले. जालना येथून शासन सेवेचा प्रवास सुरु झाला अन् बीड येथे माझ्या शासकीय सेवेतील जबाबदा-या, कर्तव्य पार पाडून ३१ मे २०२६ रोजी शासन सेवेतून सेवानिवृत होत आहे. मला सहकार्य लाभलेल्या सर्व गुरुजन वर्ग व सहका-यांचे मी ऋण व्यक्त करत नाही पण त्याच्या ऋणात राहू इच्छिते.


**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**

**(दंड विभाग)**

**जाहिर प्रगटन**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार ढाकणे नारायण सुर्यभान, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांचे वडील **सुर्यभान कारभारी ढाकणे** यांचा मृत्यू दि.०३.०८.२०१३ रोजी **मिरकाळा** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे रहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयताचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**

**(दंड विभाग)**

**जाहिर प्रगटन**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार ढाकणे पांडुरंग नरसू, रा.मिरकाळा, ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, यांची आई **मंडाबाई नरसु ढाकणे** यांचा मृत्यू दि.२४.०७.२००६ रोजी **मिरकाळा** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे रहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयताचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**

**(दंड विभाग)**

**जाहिर प्रगटन**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार ढाकणे पांडुरंग नरसू, रा.मिरकाळा, ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, यांची आजी **रंगुबाई कारभारी ढाकणे** यांचा मृत्यू दि.१०.०१.१९८० रोजी **मिरकाळा** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे रहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयताचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/३९
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- ०२/०२/२०२६

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री.सौ.श्रीमती :- १. हिना शेख अस्लम २.शेख अस्लम शेख इसहाक

प्रकरण :- सिटी सर्व्हे नंबर १८६४ न.प.मि.नं.१५-१०० चे हस्तांतरण बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनामा याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१५-१००) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला ------------------------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊन इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददूल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्धझाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा :
पुर्व :- सिटी सर्व्हे नं.३२ मधील संतोष संपत रणमळे यांची जागा
पश्चिम :- रस्ता
दक्षिण :- रस्ता
उत्तर :- सिटी सर्व्हे नं.३२ मधील शेख मुबारक कठु यांची जागा

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**

**(दंड विभाग)**

**जाहिर प्रगटन**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार ढाकणे पांडुरंग नरसू, रा.मिरकाळा, ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांचे वडील **नरसु कारभारी ढाकणे** यांचा मृत्यू दि.२१.०२.२०२४ रोजी **मिरकाळा** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे रहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयताचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**

**(दंड विभाग)**

**जाहिर प्रगटन**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार ढाकणे पुंजाराम भगवान, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांचे आई **आसराबाई भगवान ढाकणे** यांचा मृत्यू दि.०१.११.२०२० रोजी **मिरकाळा** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे रहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयताचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**

**(दंड विभाग)**

**जाहिर प्रगटन**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार ढाकणे पुंजाराम भगवान, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांचे वडील **भगवान कारभारी ढाकणे** यांचा मृत्यू दि.२१.१२.२०१६ रोजी **मिरकाळा** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे रहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयताचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**

**(दंड विभाग)**

**जाहिर प्रगटन**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार ढाकणे नारायण सुर्यभान, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांचे आई **छगाबाई सुर्यभान ढाकणे** यांचा मृत्यू दि.१६.१०.२०१५ रोजी **मिरकाळा** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे रहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयताचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, मिरकाळा ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

# गेवराई पोलीसांनी अवैध वाळु वाहतुक करणारा ट्रॅक्टरसह
## १ ब्रास वाळु ८ लाखाच्या मुद्देमालासह केली जप्त



बीड /प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील हिंगणगाव परिसरात पेट्रोलींग करत असताना सकाळी ७.३० वा. चे सुमारास एक महिंद्रा अर्जुन ५५५अख कंपनीचा ट्रॅक्टर हिंगणगावाकडुन पाथरवाला गावाकडे जात असताना मिळुन आल्याने पोलीस पथकास पाहुन चालक पळुन गेला.सदर ट्रॅक्टरचा चे.नं चेसीस.नं. चइछइएइइइछक्छा०१४४९ व इंजिन नं. छक्ा२ढ-ए०००२ असा असलेला जास जुनी वापरती विनारंगाची ट्रॉली सह जुना वापरता ट्रॅक्टर हेड व ट्रॉलीसह की. अंदाजे ८,०६,०००-रु चा माल ताब्यात घेऊन सरकारतर्फे फिर्यादीवरून पोलीस ठाणे गेवराई येथे गुरनं. ३३०/२०२६ कलम-३०३(२), ३०५ (ई) भा.न्या.सं. सह कलम ४,२१ खाण खणिज अधि. १९५७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बीड यांनी अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या दिलेल्या सुचनेप्रमाणे तसेच गेवराई तालुक्यात होत असलेल्या अवैध वाळु उत्खनन व वाहतुकी कारवाई करण्याच्या दिलेल्या ओदशाप्रमाणे गेवराई पोलीसांनी नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, समिर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड,अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर पवार, पोनि. पोलीस ठाणे गेवराई यांनी अवैध वाळु वाहतुक करणारे वाळु माफियांविरूध्द कारवाईचे नियोजन करून दिनांक २९.०५.२०२६ रोजी कारवाई केली.

सदर कारवाई नवतीत काँवत, पोलीस अधीक्षक, समिर शेख, अपर पोलीस अधीक्षक बीड, अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधीकारी उप विभाग गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, सपोनि जंजाळ, पोह हंबर्डे, पोह कल्याण राठोड, पोकाँ खांडेकर, पोकॉ गोरक्ष डोके, पोकाँ पोटे, होम सुतार यांनी सहभाग घेतला.

# पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी
## आम्रपाली साबळे यांची नियुकी




बीड /प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ संलग्न बीड जिल्हा महिला पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीबद्दल आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

आम्रपाली साबळे या सामाजिक कार्यासोबतच पत्रकारीतेत सुध्दा कार्यरत आहेत. सोशल मिडियाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नावर आवाज उठवला आहे. फेसबुक,इन्टाग्रामच्या माध्यमातून त्यांचे कार्य देशभरातील असंख्य जनते पर्यंत पोहचले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेवून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि जिल्हाध्यक्ष संतोष मानूरकर यांनी त्यांची महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. साबळे यांनी रणरागिनी सेवाभावी संस्थेची सुध्दा स्थापना केली असून राज्यभरात या संस्थेचे कार्य सुरु झाले आहे. महिला पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जयमहेश साखर कारखान्याच्या दुषीत घाण
## पाण्याच्या विरोधात डिवायएफआयचे निवेदन




माजलगाव / विजय कापसे
जय महेश साखर कारखान्याच्या सांडपाण्यामळे बोअरवेलचे पाणी दूषित होऊन आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत तक्रारदार कुंडलिक भगवान चव्हाण रा. हनुमान नगर, टाकळी तांडा, ता. माजलगाव, जि. बीड. यांनी तक्रार दाखल करून वास्तव जनतेसमोर उघड केले आहे.तक्रारीमध्ये तक्रारदार कुंडलिक भगवान चव्हाण, रा. हनुमान नगर तांडा निपाणी टाकळी यांनी म्हटले आहे की, कारखान्याचे दूषित पाणी बोरवेल मध्ये येत असल्याने तक्रारदार यांचे आजोबा सतत ताणतणावामध्ये असायचे सततच्या ताणतणावामुळे त्यांना हृदयविकाराचा झटका आला त्यात ते मरण पावले.मी व माझे कुटुंब हनुमान नगर परिसरात वास्तव्यास असून आमच्या पिण्याच्या पाण्याचा एकमेव स्रोत आमच्या घराही बोअरवेल आहे. शेतातील पिके, भाजीपाले घाण व दुषित पाण्यामुळे खराब होत आहे. या मध्ये शेतातील मरण पावली आहे. कारखान्यातुन उडणारी काजळी हे पिकावर, घरावर, झाडावर येत आहे

जय महेश साखर कारखाना प्रशासनाकडून सांडपाण्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावली जात नसल्याने, हे दूषित माज रसायनयुक्त पाणी जमिनीत मुरून आमच्या बोअरवेलमध्ये येत आहे.

सदर पाणी अत्यंत काळे, दुर्गंधीयुक्त आणि विषारी झाले आहे. हे पाणी पिल्यामुळे माझ्या लहान मुलाला व कुटुंबा तील सदस्यांना उलट्या, जुलाब व पोटाचे गंभीर विकार झाले असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. कारखान्याचे

घाण पाणी, मळीचे ईथेनॉलचे पाणी आमच्या बोअर पासुन १०० मी अंतरावर सोडत आहे. याबाबत वारंवार तोंडी सांगूनही कारखाना प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. तरी झालेल्या पिकांची पाहणी करून नुकसान भरपाई देण्यात यावी.

प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष जागेवर येऊन दूषित पाण्याचा पंचनामा करुन सदर पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासून कारखान्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.तात्काळ प्रदूषित पाणी थांबवून आम्हाला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे. दूषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना कॅन्सर सारख्या दूरधर आजारांचा सामना करावा लागत आहे.प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून त्वरित कारवाई करावी. अन्यथा आम्हाला लोकशाही पद्धतीने आंदोलन करावे लागेल असा इशाराही दिला आहे.

# बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पेट्रोल डिझेल दरवाढी विरोधात आंदोलन
## इंधन टंचाई व दरवाढ तत्काळ कमी करा - राहुल सोनवणे




बीड /प्रतिनिधी
राज्यामध्ये मागील काही दिवसांपासून पेट्रोल डिझेल गॅसचा तुटवडा मोठ्या प्रमाणात सुरू असुन आज बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड येथे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे म्हणाले की, सध्या शेतीच्या मशागतीचे दिवस सुरू असून पेट्रोल डिझेल टंचाई व दरवाढ सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान व मानसिक हानी सुरू आहे मात्र पंतप्रधान मोदी परदेशात जावून चॉकलेट वाटण्याचे लाजिरवाणे काम करत आहेत. मागील १२ वर्षापासून देशात आणि राज्यात भाजपची एक हाती सत्ता असताना देखील महागाईवर कुठलेही नियंत्रण यासरकरचे दिसत नाही. लोकहिताच्या कुठल्याही योजना न आणता मन की बात करत देशातील जनतेची फसवणुक करण्याचे काम नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्ष करत असुन वाढलेली महागाई हे या सरकारचे नाकरते पणाचे लक्षण आहे. जर इंधनाचा तुटवडा कमी करून दरवाढ कमी नकेल्यास येणाऱ्या काळात बीड जिल्ह्य काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले यावेळी प्रवीणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे, दादासाहेब मुंडे, गणेश राऊत, गणेश बजगुडे, महावीर मस्के, परवेज कुरेशी, मीनाक्षी ताई पांडुळे, दत्ता कांबळे, संभाजी जाधव, प्रकाश मुंडे, राहुल जाधव, प्रवीण खोडसे, सय्यद फारुख, आकाश गायकवाड, शिवाजी कोटुळे,शिवाजी देशमुख, इलियास टेलर, शेख मोहसिन, शेख अमर, गणेश कारंडे, शेख नौशाद, अशोक केदार, अशोक बहिरवाल, विशाल मस्के, हरिभाऊ सावंत, राम शेळके, शेख मुशर्रफ, अविनाश दरपे, उद्धव जोगदंड, विजय पवार, कल्याण टेकाळे, विष्णू मस्के, मनोहर गीते, शेख जाहीर, शाम मुंडे, दीपक कराड, जमील खान यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री सद्गुरु नराशाम महाराज मठ येवती संस्थानात अधिक मासानिमित्त हजारो भाविकांनी घेतला पुरणपोळी तूप महा प्रसादाचा घेतला लाभ




मुखेड /प्रतिनिधी
मुखेड तालुक्यातील येवती येथील श्री परमपूज्य सद्गुरु नराशाम महाराज मठ संस्थान (लघु आळंदी) व समस्त ग्रामस्थांच्या वतीने अधिक मासानिमित्त गुरुवारी दिनांक २८ मे रोजी भव्य तुप-पुरणपोळी महाप्रसाद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिक वातावरण, भक्तिमय नामस्मरण आणि सेवाभावाच्या पवित्र संगमाने संपूर्ण मठ परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

अधिक मास हा हिंदू धर्मामध्ये अत्यंत पवित्र आणि पुण्यप्रद मानला जातो. या महिन्यात जप, तप, दानधर्म, अन्नदान आणि भक्ती यांना विशेष महत्त्व असते. त्यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या महाप्रसाद सोहळ्यात पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मठ संस्थान परिसरात पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

श्री सद्गुरु नराशाम महाराजांच्या कृपेने प्रेम, सेवा आणि भक्तीभावाने संपन्न झालेल्या या प्रसादरूपी भोजनाचा लाभ तब्बल हजारो भाविकांनी घेतला. तुप-पुरणपोळी, विविध पारंपरिक खाद्यपदार्थ आणि प्रसादाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. महिला-पुरुष, वृद्ध, युवक तसेच लहान मुलांनीही मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला.

अन्नदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या पुण्यकार्याला गावातील सेवेकरी, तरुण मंडळे, महिला भगिनी तसेच ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रमात सेवाभाव, भक्ती आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडले.

मठ संस्थान परिसरात दिवसभर भजन, नामस्मरण व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना करून सुख, समृद्धी आणि समाजकल्याणासाठी आशीर्वाद घेतले.

या धार्मिक सोहळ्यामुळे येवती गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा महाप्रसाद सोहळा पंचक्रोशीत आकर्षणाचा विषय ठरला.

अधिक मास निमित्ताने दररोज महाप्रसादाची सेवा श्री परमपूज्य सद्गुरु नराशाम महाराज मठ संस्थान, येवती येथे अधिक मासानिमित्त दिनांक. १७ मे २०२६ ते १६ जून २०२६ या कालावधीत दररोज सकाळ व सायंकाळच्या वेळेस भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या सेवेतून दररोज पंचक्रोशीतील सुमारे पाच हजार भाविक लाभ घेत आहेत. ज्या भक्तांना पंगत देण्याची इच्छा आहे त्यांनी मठ संस्थानाशी संपर्क साधून या पुण्यकार्यात सहभागी व्हावे.असे आवाहन श्री मठ संस्थान च्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रा. आमेर फराज सरांना प्रतिष्ठित भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम स्मृती 'मेडिकल मेंटॉर' जीवनगौरव पुरस्कार जाहीर

बीड /प्रतिनिधी
नीट परीक्षेच्या क्षेत्रात आपल्या अध्यापन शैलीने बीडसह संपूर्ण मराठवाड्यातील विद्यार्थ्यांच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नांना पंख देणारे, 'स्कॉलर्स बायोलॉजी हाऊस, बीड'चे सर्वेसर्वा शिक्षक प्रा.आमेर फराज यांना यंदाचा सर्वोच्च आणि अत्यंत मानाचा भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम स्मृती 'मेडिकल मेंटॉर' जीवनगौरव पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून या ऐतिहासिक पुरस्काराची अधिकृत घोषणा करण्यात आली.साप्ताहिक युवा लोकमित्र' आणि 'युवा लोकमित्र परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय, आदर्शवत व प्रदीर्घ कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात येतो. उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने शिक्षण आणि विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याच्या क्षेत्रातील अभूतपूर्व व क्रांतिकारी योगदानासाठी प्रा. आमेर फराज सरांची या सर्वोच्च पुरस्कारासाठी एकमुखाने निवड केली आहे.

'स्कॉलर्स बायोलॉजी हाऊस' हे आज 'फ्युचर मेडिकोस'साठी विश्वासाचे दुसरे नाव बनले आहे. प्रा. आमेर फराज सरांचे अध्यापनाप्रती असलेले समर्पण, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी नियमित घेतल्या जाणाऱ्या टेस्ट व सराव प्रश्नपत्रिका यामुळे त्यांनी बीडच्या शैक्षणिक क्षेत्रात आपला मोठा ठसा उमटवला आहे. अनेक गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देण्याचे काम ते अविरतपणे करत आहेत.

२० जून रोजी भव्य सोहळ्यात वितरण

हा दिमाखदार गौरव सोहळा येत्या शनिवार, २० जून २०२६ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता 'ताज पॅलेस', कादरपुरा, बार्शीनाका, बीड येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज



मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

एक शिक्षक केवळ पुस्तकी ज्ञान देत नाही, तर तो पिढ्या घडवतो. थोर बुद्धिजीवी व माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांचा वारसा चालवत प्रा. आमेर फराज सरांनी बीडमधून अहोरात्र मेहनत घेऊन शेकडो डॉक्टर्स निर्माण केले आहेत. अशा निष्ठावंत आणि प्रेरणादायी 'मेडिकल मेंटॉर'चा सन्मान करताना युवा लोकमित्र परिवाराची मान अभिमानाने उंचवली आहे. - शेख ताहेर जाफर (संपादक, साप्ताहिक युवा लोकमित्र, बीड)

# अनेक वर्षांपासून प्रलंबित चौसाळा ते वाढवणा रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी - अशोक लोढा



बीड /प्रतिनिधि
अनेक वर्षांपासून प्रलंबित चौसाळा ते वाढवणा रस्त्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून मार्गी लागला आहे. चौसाळा ते वाढवणा रस्त्याचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत चालू आहे. सदरील कामाची चौसाळा सर्कलचे जि.प.सदस्य तथा भाजपा बीड शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी प्रत्यक्ष पहाणी करून सुरू असलेल्या रस्त्याचे काम निष्कृष्ट पद्धतीने चालू आहे असे लक्षात येताच तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून योग्य त्या सूचना दिल्या.

चौसाळा ते वाढवणा रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली होती त्यामुळे ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता ही बाब लक्षात घेऊन पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत अशोक लोढा यांनी मा.ना. पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून चौसाळा ते वाढवणा रस्ता मंजूर करण्यात आला होता. रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली यामुळे नागरिकांचे हाल, पावसाळ्यात तर जास्तच विदारक परस्थिती होते याची जाणीव अशोक लोढा यांना असल्यामुळे पावसाळ्यापूर्वी हा उत्तम दर्जाचा रस्ता तयार व्हावा या साठी प्रयत्न करत आहेत.

या रस्त्याचे काम निष्कृट दर्जाचे चालू आहे. अशी तक्रार वाढवणा आणि पिंपळगाव घाट येथील ग्रामस्थांनी अशोक लोढा यांच्या कडे केली. या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेत ग्रामस्थांच्या उपस्थित रस्त्याच्या कामाची पाहणी केली. हा रस्ता अत्यंत दर्जेदार आणि मजबूत झाला पाहिजे तसेच जनतेच्या कामात कसलीही तडजोड किंवा हयगय खपवून घेतली जाणार नाही. अशी स्पष्ट व ठाम भूमिका घेत संबंधित अधिकारी श्री. जोगदंड साहेब यांच्याशी सविस्तर चर्चा करून उत्तम दर्जाचा रस्ता करा अशा सक्त सूचना दिल्या.चौसाळा ते वाढवणा रस्ता पूर्ण झाल्यानंतर माळेवाडी,रुई गव्हाण, मानेवाडी, पिंपळगाव घाट, वाढवणा ग्रामस्थांचा दळणवळणाचा जिव्हाळ्याचा प्रश्न सुटणार आहे. जनतेच्या हक्काच्या विकास कामांमध्ये कसलीही कुचराई होऊ न देणे आणि गावखेड्याचा शाश्वत विकास करणे हेच आपले ध्येय, कर्तव्य आहे अशी भावना अशोक लोढा यांनी व्यक्त केली आहे.

# वैद्यनाथ नगरीत अधिक मासानिमित्त इष्टलिंग महापूजा
## काशी जगद्गुरुंच्या उपस्थितीत 'मार्ग हा मुक्तीचा' ग्रंथाचे विमोचन

परळी वैजनाथ /प्रतिनिधी
अधिक मासानिमित्त वैद्यनाथ ज्योतिर्लिंग नगरी परळीत गुरुवारी धार्मिक वातावरणात इष्टलिंग महापूजा, धर्मसभा आणि 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाच्या विमोचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. काशी पीठाचे जगद्गुरू श्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी गुरुवारी परळीत दाखल झाले. यावेळी त्यांच्यासोबत सोनपेठचे श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज, श्री ष .ब्र.१०८ सदाशिव शिवाचार्य महाराज वेळापुरकर तसेच अन्य शिवाचार्य उपस्थित होते. श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने अधिक मासानिमित्त श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टच्या वैद्यनाथ प्रवचन मंडपात इष्टलिंग महापूजा, त्यानंतर धर्मसभा आणि 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाच्या विमोचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. काशी जगद्गुरूंच्या उपस्थितीत राज्यभर ३० दिवसांत ५० ठिकाणी इष्टलिंग महापूजा, धर्मसभा आणि ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले असून त्याच मालिकेतील हा परळीतील कार्यक्रम होता. धर्मसभेत मार्गदर्शन करताना काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले की, इष्टलिंग पूजा करणाऱ्या भक्ताला अपेक्षित फलप्राप्ती मिळते. प्रत्येकाने दररोज स्नानानंतर वीरशैव बांधवांनी इष्टलिंगाची पूजा करून जल दाखवल्यानंतर भोजन करावे. त्यांनी 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथातील पाच सूत्रांचे विवेचन करत मुक्तीचा मार्ग समजून घेण्यासाठी ग्रंथ वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. अधिक मासाचे धार्मिक महत्त्व स्पष्ट करत त्यांनी भाविकांना ग्रंथ वाचनाचे आवाहन केले. इष्टलिंग महापूजेस मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

यावेळी श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख, विश्वस्त विजयकुमार मेनकुदळे, डॉ. सुरेश चौधरी, श्री वक्रेश्वर देवस्थान मंदिराचे अध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे, श्री गुरुलिंग स्वामी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दत्तापा ईटके, नगरसेविका जयश्रीताई मोगरकर, माजी नगरसेविका उमाताई समशेट्टी, श्रद्धाताई हालगे, स्वाती अष्टेकर , शिक्षण समिती सभापती योगेश मेनकुदळे, श्यामभाऊ बुद्रे, रमेश चौंडे, विकास हालगे, नितीन समशेट्टी, अश्विन मोगरकर, नगरसेवक नितीन



बागवाले, कार्यकर्ते चेतन सौंदळे, सोमनाथ गोपनपाळे, प्रकाश खोत, अनिल अष्टेकर, सचिन स्वामी, राजू तीळकरी, दत्तात्रेय गोपनपाळे, ओम प्रकाश बुरांडे, संजय खाकरे, संतोष जुजगर, रमाकांत बुरांडे, चंदू हालगे, रमाकांत गुजर, बबलू गोपनपाळे यांच्यासह विविध मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार शेषराव सानप यांना जाहीर

## शैक्षणिक,सामाजिक व दिव्यांग कर्मचारी क्षेत्रातील कार्याची दखल

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथील पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे कर्तव्यदक्ष, अभ्यासू, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने झटणारे शिक्षक शेषराव सूर्यभान सानप यांची क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड जाहीर झाल्याने संपूर्ण आष्टी तालुक्यासह शैक्षणिक, सामाजिक आणि दिव्यांग कर्मचारी क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी निष्ठेने कार्य करणाऱ्या शिक्षकाचा झालेला हा राज्यस्तरीय गौरव मानला जात असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सदरील पुरस्काराचे वितरण प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते दिनांक ५ जून २०२६ रोजी पनवेल येथे होणार आहे.

राष्ट्रीय ओबीसी, बहुजन शिक्षक संघ - महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. शिक्षक म्हणून केलेल्या उल्लेखनीय कार्याची, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांची, सामाजिक जाणीव जोपासणाऱ्या कार्यपद्धतीची तसेच राष्ट्रीय व सामाजिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत हा सन्मान त्यांना बहाल करण्यात येत आहे. शिक्षण क्षेत्रात सातत्य, गुणवत्ता, विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोन आणि सामाजिक बांधिलकी यांचे सुंदर मिश्रण जपणारे शिक्षक म्हणून शेषराव सूर्यभान सानप यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

राष्ट्रीय ओबीसी, बहुजन शिक्षक संघ - महाराष्ट्र राज्याच्या राज्यस्तरीय निवडपत्रानुसार शेषराव सूर्यभान सानप हे पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, टाकळसिंग, तालुका आष्टी, जिल्हा बीड येथे कार्यरत असून त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले योगदान विशेष उल्लेखनीय मानण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आवड निर्माण करणे, शिस्तप्रियता रुजविणे, सामाजिक जाणीव वाढविणे, नैतिक मूल्यांची जपणूक करणे आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक शिक्षणाकडे प्रेरित करणे या क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत.

शिक्षक म्हणून अध्यापनापुरते स्वतःला मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्यांनी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढविणे, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी विशेष मार्गदर्शन करणे, विविध स्पर्धा परीक्षा, सांस्कृतिक कार्यक्रम, विज्ञानविषयक उपक्रम, क्रीडा व सामाजिक जाणीव निर्माण करणारे उपक्रम यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान न देता जीवनमूल्ये, सामाजिक समता, संविधानिक मूल्ये आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत.

शाळेच्या प्रगतीत आणि शैक्षणिक गुणवत्तावाढीतही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. शाळेतील शिस्त, नियोजनबद्ध शैक्षणिक वातावरण, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतांचा विकास, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, शाळा-पालक समन्वय मजबूत करणे तसेच शिक्षण प्रक्रियेत पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सकारात्मक बदल घडून येण्यास मदत झाली असून ग्रामीण भागातील शिक्षणाला नवसंजीवनी देण्याचे कार्य



त्यांनी केले आहे.

राष्ट्रीय ओबीसी, बहुजन शिक्षक संघ - महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले तसेच राज्य सरचिटणीस संतोष भोजणे यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या निवडपत्रात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, शेषराव सूर्यभान सानप यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय कार्याचा सन्मान म्हणून प्रदेश कार्यकारिणीने त्यांची क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड केली आहे. शिक्षक म्हणून त्यांचे कार्य विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असून ओबीसी प्रवर्गातील शिक्षकांमध्ये अभिमानाची भावना निर्माण करणारे आहे, असे मतही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

विशेष म्हणजे, शेषराव सूर्यभान सानप हे केवळ शिक्षक म्हणूनच नव्हे तर सामाजिक क्षेत्रातही सक्रियपणे कार्यरत आहेत. ते सध्या शासनमान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना यांच्या आष्टी तालुका सचिवपदाची जबाबदारी सांभाळत असून दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून अनेक अडचणी सोडविल्या आहेत. दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठविणे, शासकीय योजनांची माहिती उपलब्ध करून देणे, प्रशासकीय पातळीवरील अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करणे आणि संघटनात्मक कार्य सक्षमपणे राबविणे या क्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. शांत, संयमी, अभ्यासू, समतोल विचारसरणीचे आणि विद्यार्थ्यांशी आत्मीयतेने संवाद साधणारे शिक्षक अशी त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शिक्षकाची संवेदनशीलता, सामाजिक कार्यकर्त्याची बांधिलकी आणि संघटनात्मक कार्यकर्त्याची जिद्द यांचा सुंदर संगम दिसून येतो. त्यामुळेच विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि समाजातील विविध घटकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदरभाव आहे.

या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर टाकळसिंग परिसर, आष्टी तालुका तसेच बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालकवर्ग, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, दिव्यांग कर्मचारी संघटनांतील सदस्य तसेच ग्रामस्थांनी शेषराव सूर्यभान सानप यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागात राहून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या शिक्षकाचा झालेला हा राज्यस्तरीय गौरव केवळ व्यक्तिगत सन्मान नसून ग्रामीण शिक्षण व्यवस्थेसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. त्यांच्या या यशामुळे शिक्षकवर्गात नवचैतन्य निर्माण होणार असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी कार्य करणाऱ्या शिक्षकांना नवी प्रेरणा मिळेल, अशी भावना विविध स्तरांतून व्यक्त केली जात आहे.

# लोकनेते,मराठवाडा भूषण आ.सुरेश धस यांच्या शुभहस्ते अक्षरकला मार्गदर्शक अनिल बेद्रे व शिष्य कार्तिक भवर यांचा सन्मान

## राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्काराने आष्टीचा गौरव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) पंढरपूर येथे आयोजित राज्यस्तरीय अक्षर संमेलन २०२६ मध्ये राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल आष्टी येथील सुप्रसिद्ध अक्षरकला मार्गदर्शक अनिल दिगंबर बेद्रे व त्यांचे शिष्य चि. कार्तिक संतोष भवर यांचा शुक्रवार, दि. २९ मे २०२६ रोजी अद्वैतचंद्र निवासस्थानी लोकनेते तथा मराठवाडा भूषण आ. सुरेश आण्णा धस यांच्या शुभहस्ते यथोचित सन्मान करून गौरव करण्यात आला. या प्रसंगी गुरु-शिष्य परंपरेचा आदर्श जपणाऱ्या या जोडीच्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक करण्यात आले.अक्षरकला, सुलेखन, फलकलेखन व रांगोळी या क्षेत्रात सातत्यपूर्ण व उल्लेखनीय योगदान देत आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल करणाऱ्या अनिल दिगंबर बेद्रे यांनी अनेक विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलतेची प्रेरणा निर्माण केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले चि. कार्तिक संतोष भवर यांनीही



अक्षरकलेत विशेष प्रावीण्य मिळवत आपल्या मेहनतीच्या बळावर राज्यस्तरीय पातळीवर मानाचा पुरस्कार प्राप्त केला आहे. गुरुंचे मार्गदर्शन, संस्कार आणि शिष्याची जिद्द, मेहनत व सातत्य यांचा सुंदर संगम म्हणजे अनिल दिगंबर बेद्रे आणि चि. कार्तिक संतोष भवर यांची ही प्रेरणादायी गुरु-शिष्य जोडी असल्याचे गौरवोद्गार यावेळी उपस्थित मान्यवरांनी काढले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा देत ग्रामीण भागात कलाप्रेम आणि सर्जनशीलता रुजविण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे उभे केले आहे. विशेष म्हणजे माझी शाळा माझा फलक या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अक्षरकला, सुलेखन आणि फलकलेखनाची आवड निर्माण करून कलात्मक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी बेद्रे यांनी मोठे योगदान दिले आहे. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना स्वतःच्या शाळेच्या सौंदर्यीकरणात सहभाग घेण्याची प्रेरणा मिळाली असून शिक्षणासोबत कला आणि सर्जनशीलतेची सांगड घालण्याचा अभिनव प्रयत्न यशस्वी ठरला आहे.

राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्कारामुळे आष्टी तालुक्याच्या सांस्कृतिक आणि कलात्मक क्षेत्राला एक नवी ओळख मिळाली असून या यशामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, तसेच अक्षरकलेच्या संवर्धनाला नवी दिशा प्राप्त होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी आ. सुरेश आण्णा धस यांनी अनिल दिगंबर बेद्रे व चि. कार्तिक संतोष भवर यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत भवरवाडी चे सरपंच भरत भवर हे उपस्थित होते. त्यांच्या कार्यातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कला, संस्कार व सर्जनशीलतेची प्रेरणा अधिक दृढ

# एसटी सेवेत प्रदीर्घ योगदानानंतर चालक श्री.बाळासाहेब वायभासे यांचा आज सेवापूर्ती गौरव समारंभ

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आष्टी आगारातील कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय व प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत अनेक वर्षे प्रामाणिक सेवा बजावणारे चालक क्र. ३२८९, श्री. बाळासाहेब राजाराम वायभासे हे दिनांक ३१ मे २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ, उल्लेखनीय व समर्पित सेवेला गौरविण्यासाठी त्यांच्या सेवापूर्ती निमित्त विशेष गौरव समारंभ व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आष्टी आगारात कार्यरत असताना श्री. बाळासाहेब राजाराम वायभासे यांनी अनेक वर्षे जबाबदारीने सेवा बजावत हजारो प्रवाशांना सुरक्षित, वेळेवर आणि विश्वासार्ह प्रवास सेवा उपलब्ध करून दिली. आपल्या शांत, संयमी व कर्तव्यनिष्ठ स्वभावामुळे त्यांनी सहकारी कर्मचारी, अधिकारी व प्रवासी वर्गामध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. सेवाकाळात शिस्त, समयसूचकता आणि कार्यनिष्ठा या मूल्यांचे पालन करत त्यांनी परिवहन सेवेच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्यही प्रामाणिकपणे पार पाडले.

त्यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला गौरव समारंभ आज शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असून हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, आष्टी आगार, ता. आष्टी जि. बीड येथे पार पडणार आहे. या प्रसंगी निरोप समारंभासह सत्कार कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले असून विविध मान्यवर, सहकारी कर्मचारी, मित्रपरिवार व हितचिंतक उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाद्वारे श्री. बाळासाहेब राजाराम वायभासे यांच्या प्रदीर्घ सेवेला सलाम करत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. त्यांच्या कर्तव्यपरायणतेचा आदर्श नवीन



पिढीतील कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना सहकारी वर्गातून व्यक्त होत आहे.

कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक व निमंत्रक श्री. बाळासाहेब राजाराम वायभासे यांनी केले आहे. सेवेतून निवृत्त होत असताना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा विविध स्तरांतून व्यक्त होत आहेत.

# जिल्हा परिषद बीडचे माजी शिक्षण सभापती मिर्झा नियामत बेग यांना शिक्षणभूषण जीवनगौरव पुरस्कार जाहीर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सामाजिक, शैक्षणिक आणि अल्पसंख्याक समाजाच्या उन्नतीसाठी गेल्या अनेक दशकांपासून निस्वार्थ भावनेने कार्यरत असलेले जिल्हा परिषद बीडचे माजी शिक्षण सभापती तथा आदर्श संस्थाचालक मिर्झा नियामत बेग यांना शिक्षणभूषण जीवनगौरव पुरस्कार २०२६ जाहीर झाला असून त्यांच्या दीर्घकालीन शैक्षणिक, सामाजिक व मानवतावादी योगदानाचा राज्यस्तरावर गौरव होणार आहे. पुरस्कार जाहीर होताच आष्टीसह बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

साप्ताहिक युवा लोकमित्रच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आणि सहाव्या वर्षात पदार्पणाच्या औचित्याने आयोजित करण्यात आलेल्या भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार निवड समितीने नुकतीच मिर्झा नियामत बेग यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली असून शिक्षण, समाजसेवा आणि अल्पसंख्याक समाजाच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

मिर्झा नियामत बेग हे सन १९८४ पासून राजकारण आणि समाजकारणात सक्रिय असून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा सर्वसामान्यांच्या मनावर उमटवला आहे. बीड जिल्हा परिषदेमध्ये अल्पसंख्याक समाजातून शिक्षण सभापती म्हणून प्रतिनिधित्व करणारे ते एकमेव सभापती ठरले आहेत. शिक्षण क्षेत्रातील दृष्टीकोन, विद्यार्थ्यांविषयीची तळमळ आणि समाजहिताचा व्यापक विचार यामुळे त्यांनी शिक्षण प्रशासनात विशेष ओळख निर्माण केली.

याशिवाय संजय गांधी निराधार योजनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी अनेक गोरगरीब, निराधार, अनाथ, विधवा आणि गरजू नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे केले. आजही सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करण्याचे त्यांचे कार्य अखंड सुरू आहे.

उर्दू शिक्षणाचा प्रसार गावोगावी व्हावा आणि अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे या उद्देशाने त्यांनी तन्जिमे शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टीच्या माध्यमातून बीड जिल्ह्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक शैक्षणिक संस्था उभारून शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या हेतूने त्यांनी अनेक उर्दू शाळा, माध्यमिक विद्यालये आणि कनिष्ठ महाविद्यालये सुरू केली. त्यांच्या शैक्षणिक योगदानामध्ये आझाद उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय, आमेना उर्दू हायस्कूल माजलगाव, मिर्झा हशमतुल्ला बेग उर्दू शाळा आष्टी, हजरत राज मोहम्मद उर्दू प्राथमिक शाळा पाटोदा, डॉ. मिर्झा अजमतुल्ला बेग उर्दू हायस्कूल बीड, हजरत अली



उर्दू प्राथमिक शाळा कडा तसेच पीर मलिक मोहम्मद बलखी उर्दू हायस्कूल माणिकदौंडी यांसारख्या संस्थांचा समावेश आहे. या संस्थांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली असून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात त्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी, मागासवर्गीय, अनाथ, विधवा तसेच समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी त्यांनी सातत्याने कार्य करत अनेकांना शिक्षण, मार्गदर्शन व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. अनेक होतकरू तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करून देत समाज विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे कामही त्यांनी प्रभावीपणे केले आहे.

मिर्झा नियामत बेग यांच्या गेल्या ४२ वर्षांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून शनिवार, दिनांक २० जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता ताज पॅलेस, कादरपुरा, बार्शीनाका, बीड येथे होणाऱ्या भव्य राज्यस्तरीय सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय, धार्मिक, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रांतील दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करत साप्ताहिक युवा लोकमित्रचे संपादक शेख ताहेर जाफर यांनी सांगितले की, मिर्झा नियामत बेग साहेबांनी गेल्या चार दशकांहून अधिक काळ शिक्षण आणि समाजसेवेची जी अखंड तपश्चर्या केली आहे, ती संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. अल्पसंख्याक व वंचित घटकांच्या दारापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविणाऱ्या अशा खऱ्या शिक्षणमहर्षींचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करताना युवा लोकमित्र परिवाराला अभिमान वाटत आहे.

दरम्यान, पुरस्कार जाहीर झाल्याचे समजताच आष्टी, पाटोदा, शिरूर, बीड आणि माजलगाव तालुक्यासह जिल्हाभरातून विविध राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, पत्रकारिता, धार्मिक, शैक्षणिक तसेच अन्य क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांकडून मिर्झा नियामत बेग यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे.



# बीडमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ.योगेश क्षीरसागराकडून अभिवादन

बीड /प्रतिनिधी

शहरातील जवाहर कॉलनी येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अर्धाकृती पुतळ्यास भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडून गुरुवारी अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमास भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासह जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, डॉ. रवींद्र घुंबरे, ड. नागेश तांबारे, राहुल गुरखुदे, श्रीकृष्ण जोशी, प्रमोद हातोले तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा वारसा समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, क्रांतिकारी विचारसरणी आणि सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांना अभिवादन केले.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे रविवार रोजी महादेव महाराज चाकरवाडी यांचे कीर्तन



बीड (प्रतिनिधी):- विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील दहाव्या पुण्यतिथी अधीक जेष्ठ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडी ता. जि.बीड यांचे रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व बाभुळखुंटा ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# स्व. सुर्यकांत रायते पंचतत्वात विलीन, अंतिम इच्छेप्रमाणे नेत्रदानाचा संकल्प पुर्ण



बीड /प्रतिनिधी

पेठ बीड भागातील स्व. सूर्यकांतआप्पा आसारामजी रायते यांचे काल दि. २९ मे २०२६ रोजी पहाटे ४:०० वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

बीडच्या धार्मिक आणि अध्यात्मिक क्षेत्रामध्ये सर्वांना सुप्रसिद्ध असणारे बीड शहर किराणा असोसिएशनचे सक्रिय सदस्य तथा नवरंग गणेश मंडळाचे संस्थापक कार्यकर्ते स्व. सूर्यकांत रायते याचे प्रथम काळात अल्प आजाराने दुःखद निधन झाले. परम्यात्म्याच्या चरणी एकरुप होताना आपण समाजासाठी काहितरी केलं पाहिजे या उद्देशाने स्व. सुर्यकांत रायते यांनी मरनोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला होता. त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांची अंतिम इच्छा पूर्ण होण्यासाठी पुत्र जयदत्त आणि गणेश रायते यांनी शासकीय रुग्णालयाच्या नेत्रदान समुपदेशक चंद्रभागा गुरव यांना बोलावून नेत्रदान करून घेतले. त्यांची अंत्ययात्रा करिमपुरा येथील त्यांच्या निवास्थानातुन निघुन अंतिम संस्कार अमरधाम नवा मोंढा रोड येथे झाला. अंतिम संस्काराच्या वेळी सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, व्यावसायिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

# आष्टी,पाटोदा,शिरूरच्या २०० गावांसाठी माजी आमदार भीमराव धोंडे व बाळासाहेब आजबे यांची आग्रही मागणी

## समुद्रात वाहून जाणारे २० टीएमसी पाणी दुष्काळी भागाला द्या

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) बीड जिल्ह्यातील कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील जनतेच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी समुद्रात व्यर्थ वाहून जाणारे पाणी या भागाकडे वळविण्याची महत्त्वपूर्ण मागणी पुढे आली आहे. पश्चिम घाटातून अरबी समुद्रात दरवर्षी वाहून जाणाऱ्या पाण्यापैकी किमान २० टीएमसी पाणी मराठवाड्यातील या अवर्षणप्रवण पट्ट्याला उपलब्ध करून द्यावे, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नाशिक येथील नदीजोड प्रकल्प समन्वय कक्षाच्या मुख्य अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नाशिक येथील सिंचन भवनात देण्यात आलेल्या या निवेदनात आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील सुमारे २०० गावांच्या पाणीप्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष वेधण्यात आले आहे. या भागातील नागरिकांना दरवर्षी पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत असून, जानेवारी महिन्यापासूनच भीषण पाणीटंचाई सुरू होते. अनेक गावांमध्ये पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागते. पिण्याच्या पाण्याची कमतरता असल्याने शेती व्यवसायावर गंभीर परिणाम होतो आणि शेती पिकविणे कठीण बनते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार हे तालुके अनेक वर्षांपासून दुष्काळाच्या छायेत जगत आहेत. निसर्गाच्या लहरीपणामुळे पावसाचे प्रमाण अत्यल्प राहते. परिणामी, पाणीअभावी शेती कोरडी पडते आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसतो. शेतीतून उत्पन्न मिळत नसल्याने हजारो कुटुंबांतील भूमिपुत्रांना ऊसतोडणीसह विविध प्रकारच्या मजुरीसाठी राज्यभर स्थलांतर करावे लागते. त्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्याही वाढत आहेत.

या पार्श्वभूमीवर पश्चिम घाटातून दरवर्षी समुद्रात मोठ्या प्रमाणावर वाहून जाणारे पाणी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याकडे वळवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी नदीजोड प्रकल्प



व पाणीवाटपाबाबत व्यक्त केलेल्या संकल्पनेचा आधार घेत, या भागाला २० टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रस्तावामुळे केवळ पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार नाही, तर सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध झाल्यास कोरडवाहू शेतीला नवे जीवन मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. सिंचनक्षेत्र वाढल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि वर्षानुवर्षे सुरू असलेले ऊसतोड मजुरांचे स्थलांतर थांबण्यास मदत होईल. दुष्काळाचे चटके सोसणाऱ्या जनतेला कायमस्वरूपी दिलासा मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने प्रशासकीय प्रक्रिया सुरू करून या मागणीची सकारात्मक दखल घ्यावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

नाशिक येथील सिंचन भवनात सादर करण्यात आलेल्या या निवेदनावर माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यासह परिसरातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यामध्ये काकासाहेब शिंदे, दीपक घुमरे, नियामत बेग, रत्नदीप निकाळजे, अशोक साळवे, भाऊसाहेब लटपटे, दादा जगताप, अंकुश मुंडे, हरिभाऊ जंजिरे, पांडुरंग गावडे, विश्वास नागरगोजे, पांडुरंग नागरगोजे, डॉ. प्रभाकर कवठेकर, सुरेश माळी, उत्तम बोडखे, अशोक माळी, महादेव दानवे, श्याम घुले, विठ्ठल लांडगे, राजाराम नन्नवरे, सतीशमामा झगडे, नानाभाऊ वाडेकर, बजरंग कर्डिले, झुंबर चव्हाण, कृष्णा मिसाळ, सुभाष ठोंबरे, दिगंबर ठोंबरे, सुरेश शेकडे, केशव शिंदे, बाबासाहेब वाघुले, उद्धव विधाते, शहादेव गर्जे, बाळासाहेब शेकडे, कचरू काळे, तात्यासाहेब लाड आणि शिवाजी थोरवे आदींचा समावेश आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुकाध्यक्ष, महेश सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मागणीमुळे आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील दुष्काळग्रस्त नागरिकांच्या आशा पुन्हा एकदा जागृत झाल्या असून, शासनाने यावर सकारात्मक निर्णय घेतल्यास संपूर्ण परिसराच्या विकासाला नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# माहेश्वरी प्रगती मंडळ बीडच्या वतीने रविवारी गुणवंताचा सत्कार

**सत्कार सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे- अध्यक्ष सुरेंद्र कासट, सचिव जुगलकिशोर बियाणी, प्रकल्प सभापती विष्णुदास बियाणी, जगदीश सिकची**

बीड /प्रतिनिधी

माहेश्वरी प्रगती मंडळ, बीडच्या वतीने मागील अनेक दशकापासून शहरातील सामाजिक, शैक्षणिक , धार्मिक कार्यात अग्रेसर सहभाग घेतला असून माहेश्वरी प्रगती मंडळाकडून विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यात प्रामुख्याने बस स्टँडवर शितल जलपान व्यवस्था, असहाय्य रुग्णांकरता वैद्यकीय उपकरणाची व्यवस्था, अनेक वैद्यकीय चिकित्सा व शिबिरांचे आयोजन, राज्य पातळीवरील मुलींसाठी उडान चे आयोजन ,विविध शैक्षणिक उपक्रमाचे,सातत्याने मेडिकल प्रोजेक्टचे आयोजन केले जाते .

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पेठ बीड भागातील द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, विप्र नगर बीड येथे उद्या रविवार दि.३१ मे २०२६ रोजी दुपारी ठिक ४.०० वा. गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे तसेच याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक स्मिता सुभाषजी बाहेती (नायब तहसीलदार, अंबाजोगाई) व मार्गदर्शक श्री गंमतभाऊ भंडारी (संपादक दै पार्श्वभुमी बीड ) आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन संपन्न होणार आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२५- २६ मधील दहावी, बारावी सर्व शाखा (कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे) ,सी.बी.एस.ई., आय. सी. एस.सी. शाखेतील ७५% व त्यापेक्षा अधिक गुणांकन प्राप्त विद्यार्थ्यांचे पालक व परिवारासमवेत विशेष प्रमुख मान्यवरांच्या हस्ते , स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्प मालाद्वारे सन्मानित करून त्यांना पुढील शिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त तज्ञांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या सत्कार सोहळ्यात समाज बांधवांसह महिला, पुरुष, युवक, युवती जेष्ठ नागरिकासह समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट , सचिव जुगलकिशोर बियाणी, प्रकल्प सभापती श्री विष्णूदास बियाणी, जगदीश सिकची यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य माहेश्वरी प्रगति मंडळ बीड यानी केले आहे.

या कार्यक्रमात सर्व विद्यार्थीना प्रमुख अतिथिद्वारा मोटिवेशनल मार्गदर्शन होणार आहे तरी सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्रीराम ज्युनिअर कॉलेज,कडाची उज्वल यशाची परंपरा कायम

## १५ विद्यार्थ्यांना ग्री विषयात शंभर पैकी शंभर गुण




आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील कडा येथील श्रीराम ज्युनिअर कॉलेज, कडा यांनी इयत्ता बारावीच्या परीक्षेत पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेची उज्वल परंपरा कायम राखली आहे. विशेषतः कृषी (ग्री) विषयामध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. तब्बल १५ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवत अभूतपूर्व यशाची नोंद केली असून, ८ विद्यार्थ्यांनी ९९ गुण मिळवत यशाची परंपरा अधिक भक्कम केली आहे.

महाविद्यालयातील कृषी विषयासाठी एकूण ७० विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवून आपल्या मेहनतीचा ठसा उमटवला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कृषी शिक्षणाचा महत्त्वपूर्ण मार्ग खुला करणाऱ्या या यशामुळे महाविद्यालयाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

१०० पैकी १०० गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. सोनाली संतोष देशमुख, कु. रिया गणेश ढवन, कु. अनुष्का सतीश फुंदे, कु. संगरक्षिता शिवाजी कांबळे, कु. सायली दिलीप जाधव, कु. प्रियांका राजू मडके, कु. प्रतिक्षा गोविंद इरले, कु. रोशनी गौतम आहेर, कु. तनुजा बाबासाहेब वाघुले, कु. वैष्णवी आबासाहेब पवार, कु. सानिका सोमनाथ जगधने, कु. किरण राजेंद्र आटोळे, कु. वैष्णवी आजिनाथ राऊत यांच्यासह ओम विजय मेहेत्रे व अल्बख्शा खुर्शीद पठाण यांचा समावेश आहे.तसेच ९९ गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शिवम सोमनाथ काळे, कु. विशाखा विकास खंडागळे, तेजस अशोक कर्डिले, कु. निकिता ज्ञानेश्वर कर्डिले, किरण बाळासाहेब बिरंगल, कु. पूजा अनिल गोंदकर, कु. अनुष्का दादासाहेब शिंदे व पियुष जालिंदर राऊत यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत व योग्य मार्गदर्शनाच्या बळावर हे यश संपादन केले आहे.

या उल्लेखनीय यशामागे कृषी विषयाचे अभ्यासू व विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन करणारे प्रा. दत्तात्रय ढवळे यांचे मोलाचे योगदान असल्याचे मानले जात आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासातील संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून देणे, नियमित सराव चाचण्या घेणे, गुणवत्तेनुसार मार्गदर्शन करणे आणि आत्मविश्वास वाढविणे यामुळे विद्यार्थ्यांना हे घवघवीत यश मिळाले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दादासाहेब काळे व उपप्राचार्य प्रा. संजय धोंडे यांनीही विद्यार्थ्यांना सातत्याने प्रेरणा, शैक्षणिक दिशा आणि प्रोत्साहन दिले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक भवितव्यासाठी कृषी विषय अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले आहे. इयत्ता बारावीमध्ये कृषी विषय घेतल्यास विद्यार्थ्यांना बी.एस्सी. (ग्री) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत १० टक्के अतिरिक्त गुणांचा लाभ मिळतो. त्यामुळे गुणवत्तेनुसार नामांकित कृषी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळविणे विद्यार्थ्यांसाठी अधिक सुलभ ठरते.याशिवाय कृषी विषयामुळे विद्यार्थ्यांना विविध शासकीय सेवांमध्ये संधी उपलब्ध होत आहेत. पोलीस भरती, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, सहाय्यक कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी विस्तार अधिकारी, कृषी अधीक्षक अशा अनेक पदांसाठी कृषी शिक्षण उपयुक्त ठरत आहे. तसेच साखर कारखाने, कीटकनाशक उद्योग, रासायनिक व जैविक खत उत्पादक कंपन्या तसेच नामांकित बियाणे उत्पादक कंपन्यांमध्ये कृषी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या अनेक संधी निर्माण होत आहेत.

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा शिक्षण महर्षी, माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब, युवा नेते तथा महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, प्रशासन अधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक-प्राध्यापिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे श्रीराम ज्युनिअर कॉलेज, कडा परिसरात चर्चेचा विषय ठरले असून, गुणवत्तेच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचे कार्य महाविद्यालय सातत्याने करत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालक, शिक्षक व परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, महाविद्यालयाच्या उज्वल शैक्षणिक परंपरेत आणखी एका यशस्वी पर्वाची नोंद झाली आहे.

# दादांच्या लाडक्या आमदारांनी जागवल्या अविस्मरणीय आठवणी

## अजित स्मृती व्याख्यानमालेचे चौथे पुष्प







बीड(प्रतिनिधी)पहिल्यांदाच आमदार झालो...वैधानिक पदावर कसे काम करायचे... सभागृहात कसे बसायचे... कसे बोलायचे.. समाजात वागताना सुध्दा तुमच्याकडे महाराष्ट्र पहात असतो याचे भान कसे ठेवायचे... हे सर्व काही दादांनी मला शिकवले. परंतु गुरुंचा सहवास फक्त दिड वर्ष मिळाला. या काळात जे दादांकडून शिकायला मिळाले त्या सर्व गोष्टी आचरणात आणून दादांनी दाखवलेल्या मार्गावर आता चालत राहणार आहे. दादांची जागा सुनेत्राताई वहिनींनी घेतल्यामुळे आता त्यांचे हात बळकट करण्यासाठी पहिल्यापेक्षा अधिक जोमाने काम करणार असल्याचे प्रतिपादन गेवराईचे आ.विजयसिंह पंडित यांनी केले. दादांच्या लाडक्या आमदारांनी अजित स्मृती व्याख्यानमालेचे चौथे पुष्प अर्पण करताना अनेक अविस्मरणीय आठवणी जागवल्या. त्या ऐकताना सभागृह स्तब्द झाले होते.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने सुरु केलेल्या अजित स्मृती व्याख्यानमालेचे चौथे सत्र दि.२८ मे रोजी संपन्न झाले. या कार्यक्रमाला आ.विजयसिंह पंडित यांच्यासह जेष्ठ नेते मोईन मास्टर,प्रसिध्द सर्जन डॉ.अनिल बारकुल,ॲग्रो इनपुट डिलर असोसिएशन नवी दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री, जेष्ठ विधीज्ञ ॲड.राम औटे, संपादक राजेंद्र होळकर,उप अभियंता महेंद्र निकम,न.प.सभापती बाळासाहेब गुंजाळ, न.प.सभापती रणजीत बनसोडे, जेष्ठ नगरसेवक भीमराव वाघचौरे, नगरसेवक भैय्यासाहेब मोरे, नगरसेवक महेश धांडे, जेष्ठ उद्योजक सुशिल खटोड,अभिनेत्री शोभा सिरसाट,जेष्ठ पत्रकार जगदिश पिंगळे, जेष्ठ संपादक वैभव स्वामी आदि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी बोलतांना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, जनसामान्यांच्या मनात आजही अजित दादांचे कार्य, त्यांचे विचार जिवंत आहेत.चंद्र-सुर्य असे पर्यंत दादांची किर्ती दिगंत राहिल. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने व्याख्यानमालेचा उपक्रम सुरु केल्याबद्दल आ.पंडित यांनी वसंत मुंडे आणि संतोष मानूरकर यांचे विशेष कौतुक केले. दादांच्या सहवासातील आठवणींना उजाळा देताना आ.पंडित यांनी विधीमंडळात दादांकडून मिळालेले मार्गदर्शन खुप महत्वाचे होते. त्यांच्यामुळेच मला सातत्याने सभागृहात बोलण्याची संधी मिळाली. सभागृहातील त्यांची अभ्यासपुर्ण मांडणी, निर्णय क्षमता, कार्यकर्त्या प्रती असलेली आत्मीयता आणि जनतेच्या प्रश्ना विषयीची संवेदनशिलता. हे दादांचे सर्व गुण आचरणात आणण्यासारखे आहेत.दादांचे मार्गदर्शन अनेक वर्ष मिळत राहिल या भावनेतून काम करत असताना अचानक झालेले दादांचे निधन ही कधीच भरुन न येणारी क्षती आहे.सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वाला बळ देत दादांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी आम्ही कटिबध्द असल्याचे आ.पंडित म्हणाले.

या प्रसंगी उपस्थित सर्व पाहुण्यांनी स्व.अजित दादांच्या नेतृत्व गुणांविषयी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आम्रपाली साबळे यांनी केले. स्व.अजित दादांच्या लाडक्या बहिणींना या प्रसंगी रणरागिनी सेवाभावी संस्थेच्या वतीने साड्यांचे वाटप करण्यात आले. समारंभाचे सुत्रसंचालन नितीन क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रतिक कांबळे यांनी केले.

# जालन्यात पोस्टाने ऑनलाईन तलवार मागवणारा गजाआड दहशतवाद विरोधी पथकाची मोठी कारवाई

जालना शेख फारुक :-

ऑनलाईन शॉपिंगवरून कपडे मोबाईल मागवल्याचे तुम्ही ऐकले असेल पण जालन्यात चक्क ऑनलाईन तलवार मागवून दहशत माजवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इसम पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे जालना पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने अत्यंत गुप्तपणे आणि धडक कारवाई करत या आरोपीला मुसक्या आवळल्या आहेत. त्याच्याकडून तीक्ष्ण तलवार जप्त करण्यात आली असून या कारवाईमुळे अवैध हत्यार बाळगणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.गुप्त बातमीदाराचा तो अचूक सुगावा आणि खेळ खल्लास

जालन्याचे पोलीस अधीक्षक मा.श्री.तेघबीर सिंह संधू आणि अपर पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यात अवैध हत्यारे बाळगून दहशत माजवणाऱ्या गुंडांचा बिमोड करण्याचे कडक आदेश दिले होते. दरम्यान दहशतवाद विरोधी पथकाचे सपोनि श्री. इंगेवाड यांना त्यांच्या अत्यंत विश्वासू गुप्त बातमीदाराकडून एक खळबळजनक माहिती मिळाली. शिवाजी पुतळ्याजवळील पोस्ट ऑफिसमध्ये ऑनलाईन पद्धतीने एक तलवार मागवण्यात आली असून एक तरुण ती घेऊन जाणार आहे.

पोस्ट ऑफिसजवळ टाकला छापा

माहिती मिळताच पथकाने कसलाही वेळ न घालवता शिवाजी पुतळा परिसरातील पोस्ट ऑफिसजवळ दबा धरला. अचूक टायमिंग साधत पोलिसांनी संशयित आरोपीला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ३,५००/- रुपये किमतीची धारदार तलवार मिळून आली पोलिसांनी तात्काळ ती तलवार जप्त केली आणि आरोपीला बेड्या ठोकल्या.

आरोपीची कुंडली आणि गुन्हा दाखल

सिद्धेश्वर एकनाथ राठोड वय २४ वर्षे

रा.म्हाडा कॉलनी आस्था हॉस्पिटलच्या पाठीमागे शिवाजी नगर भोकरदन नाका जालना.

दाखल गुन्हा सदर बाजार पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा गुरनं /२०२६ दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

या शिलेदारांनी फत्ते केली कामगिरी

पोलीस अधीक्षक मा.श्री. तेघबीर सिंह संधू,अपर पोलीस अधीक्षक मा.विक्रम साळी, आणि उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.अनंत कुलकर्णी यांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली ही धडक मोहीम राबवण्यात आली.या कारवाईत दहशतवाद विरोधी पथकाचे सपोनि सचिन इंगेवाड, सपोउपनि शिवरकर, पोहेकॉ गडधे, आणि पोहेकॉ सोनवणे या धाडसी पोलीस अंमलदारांनी मोलाची भूमिका बजावली. पोलिसांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे जालन्यातील गुन्हेगारी जगतात तीव्र खळबळ



उडाली आहे.

अवैध हत्यार बाळगून शहरात भाईगिरी किंवा दहशत माजवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची गय केली जाणार नाही जालना पोलीस प्रशासन.

# लेहा गावच्या लेकीची न्यायव्यवस्थेत गरुडझेप भोकरदनच्या शिरपेचात मानाचा तुरा

## कु.आरती ज्ञानेश्वर सोनवणे यांची न्यायाधीश पदी दैदिप्यमान निवड

भोकरदन इसरारखान पठाण :-

शिक्षण हाच खरा दागिना या विचाराला सत्यात उतरवत जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील लेहा या छोट्याशा गावातील कु.आरती ज्ञानेश्वर सोनवणे हिने न्यायव्यवस्थेच्या क्षेत्रात अभिमानास्पद भरारी घेत संपूर्ण तालुक्याची मान उंचावली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या न्यायाधीश गचत्रऊ परीक्षेत घवघवीत यश संपादन करत तिने न्यायाधीश पदाला गवसणी घातली आहे. तिच्या या नेत्रदीपक यशामुळे लेहा गावासह संपूर्ण भोकरदन तालुक्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.अत्यंत सामान्य कुटुंबातून आणि ग्रामीण परिस्थितीतून पुढे आलेल्या आरतीने प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत हे यश संपादन केले. लहानपणापासूनच अभ्यासू आणि ध्येयवेडी असलेल्या आरतीने अथक परिश्रम प्रचंड मेहनत आणि स्वतःवरील अढळ विश्वास यांच्या बळावर यशाची ही उंच शिखरे सर केली. तिच्या यशामागे वडील ज्ञानेश्वर सोनवणे यांचे कष्ट आईचे संस्कार आणि गुरुजनांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

रात्रीचा दिवस करून केलेला अभ्यास अपार जिद्द आणि मी करू शकते हा आत्मविश्वास यामुळेच आरतीने न्यायाधीश पदाचा मान पटकावला. ग्रामीण भागातील मुलींसाठी ती प्रेरणास्थान ठरली असून मुलगी शिकली, प्रगती झाली याचे ती जिवंत उदाहरण बनली आहे.

निवडीनंतर भावना व्यक्त करताना आरती सोनवणे म्हणाली हे यश केवळ माझे नसून माझ्या आई-वडिलांचे गुरुजनांचे आणि लेहा गावातील प्रत्येक व्यक्तीचे आहे. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी मी प्रामाणिकपणे कार्य करेन. संविधान हेच माझ्यासाठी सर्वोच्च असेल.

आरतीच्या निवडीची बातमी वाऱ्यासारखी पसरताच लेहा गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. आमदार, माजी आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रामस्थ तसेच विविध



सामाजिक संघटनांनी तिच्या घरी भेट देत सत्कार करून शुभेच्छांचा वर्षाव केला. विशेषत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आणि मुलींनी आरतीचा आदर्श घ्यावा अशा भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहेत.

समर्थ राजयोग परिवाराकडून मनःपूर्वक अभिनंदन

कु.आरती ज्ञानेश्वर सोनवणे हिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल समर्थ राजयोग परिवारातर्फे तिचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून पुढील वाटचालीस लाख लाख शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. तिच्या या यशामुळे भोकरदनचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात अभिमानाने झळकले आहे.

# अंबड तहसीलदार विजय चव्हाण यांच्या न्यायी निर्णयाने खुला झाला पूर्वजांचा रस्ता

## चांभारवाडीतील बहुरे कुटुंबीयांचा भावनिक आभार वर्षाव

अंबड प्रतिनिधी :-

अधिकारी असावा तर असा अशी भावना आज चांभारवाडी ग्रामस्थांच्या तोंडी ऐकायला मिळत आहे.अंबडचे तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी विजय चव्हाण यांच्या संवेदनशील आणि न्यायप्रिय निर्णयामुळे अनेक वर्षांपासून बंद असलेला चांभारवाडी येथील पारंपरिक रस्ता अखेर मोकळा झाला असून समस्त बहुरे व संबंधित कुटुंबीयांनी तहसील प्रशासनाचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.आजोबा-पंजोबांच्या काळापासून वापरात असलेला हा मार्ग केवळ एक रस्ता नव्हता तर गावाशी जोडलेले नाते पूर्वजांच्या आठवणी आणि कुटुंबाच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग होता. मात्र अनेक वर्षांपासून हा रस्ता बंद झाल्याने बहुरे कुटुंबीयांना मोठा मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत होता. शेतात ये-जा शेतीची कामे आणि दैनंदिन व्यवहार करताना अनेक अडचणी निर्माण होत होत्या.आपल्या हक्काच्या मार्गापासून दूर राहण्याची वेदना आम्ही कायम अनुभवत होतो अशी भावनिक प्रतिक्रिया कुटुंबीयांनी व्यक्त केली.

अनेक प्रयत्नांनंतरही प्रश्न सुटत नसल्याने ग्रामस्थ निराश झाले होते. मात्र तहसीलदार विजय चव्हाण यांनी हा विषय केवळ सरकारी फाईल म्हणून न पाहता सर्वसामान्यांच्या भावना आणि न्यायाचा प्रश्न म्हणून हाताळला. त्यांनी परिस्थितीची सखोल दखल घेत रस्ता मोकळा करण्यास परवानगी दिली आणि वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावला.

या निर्णयानंतर चांभारवाडी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ज्येष्ठ



नागरिकांच्या डोळ्यांत अक्षरश आनंदाश्रू पाहायला मिळाले. आमच्या आयुष्यात पुन्हा एकदा तो जुना मार्ग खुला होताना पाहिला हे आमच्यासाठी अविस्मरणीय समाधान आहे अशा भावना बहुरे कुटुंबीयांनी व्यक्त केल्या.

समस्त बहुरे व संबंधित कुटुंबीयांनी तहसीलदार विजय चव्हाण यांचे कौतुक करताना म्हटले की सर आपण आमच्यासाठी केवळ अधिकारी नाही तर न्याय देणारे आणि सामान्य माणसांच्या भावना जपणारे व्यक्तिमत्त्व आहात. आपल्या एका निर्णयामुळे आमच्या मनावरील अनेक वर्षांचा भार हलका झाला आहे. बंद झालेला रस्ता तर मोकळा झाला आहेच पण त्यासोबत आमच्या आशा विश्वास आणि आनंदही पुन्हा जिवंत झाला आहे.

सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे मानवी दृष्टिकोनातून पाहत न्याय देणारे अधिकारी म्हणून तहसीलदार विजय चव्हाण यांची प्रतिमा अधिक ठळक झाली असून त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अखेर भोकरदन बसस्थानक सीसीटीव्ही च्या निगराणीखाली


सौ.अनिता जाधव यांच्या आक्रमक पाठपुराव्याला अखेर यश महिला प्रवाशांनी व्यक्त केला दिलासा

भोकरदन इसरारखान पठाण :-

बसस्थानक परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या चोरी महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावण्याच्या घटना छेडछाड तसेच संशयास्पद हालचालींमुळे महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अशा गंभीर परिस्थितीत बसस्थानकातील सीसीटीव्ही कॅमेरेच बंद असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या महिला पदाधिकारी सौ.अनिता अंकुश जाधव यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे अखेर भोकरदन बसस्थानकात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत.

महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा लावून धरत सौ.जाधव यांनी वरिष्ठ प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करत तात्काळ कॅमेरे बसविण्याची जोरदार मागणी केली होती.याकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. त्यांच्या या आक्रमक भूमिकेची दखल घेत जाफ्राबाद आगार प्रशासनाने तत्काळ विभागीय कार्यालय जालना यांच्याशी पत्रव्यवहार करून आवश्यक साहित्य मागविले.

विशेष म्हणजे दि.१६ मे २०२६ रोजी आगार व्यवस्थापकांनी स्वतः पत्र देऊन सीसीटीव्ही बसविण्याबाबतची माहिती सौ.



अनिता जाधव यांना दिली होती.त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच भोकरदन बसस्थानकात नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ते सुरू करण्यात आले.बसस्थानकात सीसीटीव्ही यंत्रणा सुरू झाल्याने महिला प्रवासी ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.आता दागिने, मोबाईल, पर्स चोरीच्या घटनांवर मोठ्या प्रमाणात आळा बसेल, तसेच संशयितांवर लक्ष ठेवणे प्रशासनाला अधिक सोपे होणार असल्याच्या प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त होत आहेत.

महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवत सौ. अनिता जाधव यांनी प्रशासनाला अक्षरश जागे केले असून त्यांच्या पाठपुराव्यामुळेच अखेर भोकरदन बसस्थानक सीसीटीव्ही च्या निगराणीखाली आले असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

# घुंगर्डे हादगाव येथे घराची भिंत कोसळून दोन अल्पवयीन मुलांचा दुर्दैवी मृत्यू गावावर शोककळा

घुंगर्डे हादगाव प्रतिनिधी :-

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. पडीक घराच्या जीर्ण भिंतीजवळ खेळत असताना अचानक भिंत अंगावर कोसळल्याने दोन अल्पवयीन मुलांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

मृत मुलांमध्ये शौर्य गोरख कासार रा. घुंगर्डे हादगाव व चैतन्य राधाकिसन भिसे वय अंदाजे १२ वर्षे रा.मारफळा ता. गेवराई यांचा समावेश आहे. चैतन्य भिसे हा मामाच्या गावी घुंगर्डे हादगाव येथे आला होता.

मिळालेल्या माहितीनुसार दुपारच्या वेळी दोन्ही मुले गावालगत असलेल्या एका पडीक व जीर्ण घराच्या भिंतीजवळ खेळत होती.



याचवेळी अचानक भिंत कोसळून दोघेही ढिगाऱ्याखाली दबले गेले. परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत मुलांना बाहेर काढून अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले.

या दुर्दैवी घटनेमुळे घुंगर्डे हादगाव गावात शोककळा पसरली



असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. दोन निष्पाप चिमुकल्यांचा अकाली मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.दरम्यान गावातील जीर्ण व पडीक इमारतींमुळे नागरिकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला असून अशा धोकादायक इमारतींची तातडीने पाहणी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# जालना शहरात पीस फाउंडेशनतर्फे राज्यस्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

## शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती समाज प्रबोधनासह व्यक्तिमत्व विकासावर भर

जालना शेख फारुक :-

शहरातील कृषी विज्ञान केंद्र खरपुडी येथे पीस फाउंडेशन महाराष्ट्र राज्यतर्फे राज्यस्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास राज्यभरातून कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे उद्घाटन जालना जिल्ह्याच्या उपजिल्हाधिकारी मा. पगारे मॅडम यांच्या हस्ते वृक्षारोपण व झाडाला पाणी घालून करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून पीस फाउंडेशन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. आर्कि. अर्षद शेख, अल्पसंख्यांक आयुक्तालयाचे आयुक्त मा. करण पवार, शेती सहाय्य मंडळ जालना सचिव विजय अण्णा बोराडे, मा. आलम खान कोटकर तसेच मराठवाडा समन्वयक



मिर्झा अफसर बेग यांची उपस्थिती लाभली.

शिबिरामध्ये शासनाच्या विविध विभागातील अधिकाऱ्यांनी उपस्थितांना योजनांविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यामध्ये व्ही.एन.कायदे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जालना, शाम राठोड जिल्हा आरोग्य विभाग,डॉ. पंडित वासरे शास्त्रज्ञ,कृषी विज्ञान केंद्र खरपुडी,मा.करण पवार समाज कल्याण अधिकारी जालना तसेच मा. प्रकाश पडोळ जिल्हा व्यवस्थापक मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ जालना यांनी विविध योजनांची माहिती देत कार्यकर्त्यांना जनजागृतीसाठी प्रेरित केले.

उपजिल्हाधिकारी पगारे मॅडम यांनी आपल्या प्रभावी भाषणातून शासनाच्या विविध खात्यांच्या योजनांची माहिती देत समाजातील दुर्बल व वंचित घटकांच्या विकासासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.तर अध्यक्षीय भाषणात डॉ. आर्किटेक्ट अर्षद शेख यांनी समाजातील जातीयता, अंधश्रद्धा, सामाजिक समस्या यांसारख्या गंभीर विषयांवर भाष्य करत व्यक्तिमत्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक विचारसरणी यांचे महत्त्व अधोरेखित केले.


शिबिर यशस्वी होण्यासाठी अब्दुल वहीद सर माजी शिक्षणाधिकारी,मिर्झा कैसर, मिर्झा ओझर, शेख नईम, युसुफ बागवान, शेख कयूम, इंजि. मोईन, फारूख गाझी, सय्यद सिराज, वकील मोईन सर यांच्यासह कृषी विज्ञान केंद्राच्या सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. बिस्मिल्ला सैय्यद सर यांनी केले तर आभार प्रदर्शन मिर्झा अफसर बेग यांनी मानले. उत्साहपूर्ण वातावरणात आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत हे राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले.

# प्रा. मोटेगावकर आणि प्रा. कुलकर्णींना न्यायालयीन कोठडी, डॉ. शिरुरेंना सीबीआय कोठडी!




पुणे : देशभर गाजलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने अत्यंत धडक कारवाई सत्र सुरू ठेवले आहे. लातूरमधील पेपरफुटीच्या रॅकेटचे मुख्य दुवे मानले जाणारे आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर आणि 'एनटीए'चे माजी पेपर सेटर प्रा. प्रल्हाद व्ही. कुलकर्णी यांच्या सीबीआय कोठडीची मुदत संपल्यानंतर, विशेष न्यायालयाने त्यांना १० जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दुसरीकडे, याच साखळीत महत्त्वाचे कनेक्शन समोर आलेले लातूरचे बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना अटक करून सीबीआय कोठडीत पाठवण्यात आले आहे. सीबीआयने या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला असून तपासात अत्यंत धक्कादायक खुलासे समोर येत आहेत.सीबीआयने केलेल्या बँक खात्यांच्या तांत्रिक तपासणीत अत्यंत मोठी माहिती समोर आली आहे. प्रा. पी. व्ही. कुलकर्णी आणि प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी संगनमत करून नीट परीक्षेचा रसायनशास्त्र विषयाचा पेपर गरजू विद्यार्थी आणि पालकांना १० ते १२ लाख रुपयांना विकल्याचे उघड झाले आहे.

# साठवण तलावात बुडून एमबीएच्या तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू




राहता (जि. अहिल्यानगर) – चंद्रपूर गावातील साठवण तलावात बुडून तीन तरुण विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. मृत झालेले तिन्ही विद्यार्थी स्थानिक कॉलेजमध्ये एमबीएच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत होते. ही घटना गुरुवारी सायंकाळी पाच वाजता घडली. अभिषेक गंगाधर जाधव (वय २४, रा. सुरेगाव शिंगणापूर, ता. नेवासा), प्रवीण प्रभाकर रसाळ (वय २३, रा. रामनगर, छत्रपती संभाजीनगर) आणि महेश अशोक शिंदे (वय २६, रा. संत ज्ञानेश्वरनगर, छत्रपती संभाजीनगर) अशी मृत विद्यार्थ्यांची नावे आहेत.

तिघे विद्यार्थी 'पायरेन्स आयबीएमए' कॉलेजमध्ये शिकत होते. ते कॉलेजच्या बाहेर रुम करून राहत होते. गुरुवारी कॉलेजला सुटी असल्याने आणि उकाडा वाढल्याने ते पोहण्यासाठी गेले होते. तलावाच्या पाण्यात उतरल्यानंतर पाण्याखालील खोल खड्डे आणि पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तिघेही अचानक बुडू लागले. सोबत असलेल्या मित्रांनी आरडाओरडा करत मदतीसाठी धावाधाव केली. त्यानंतर स्थानिक नागरिक घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पाण्यात उतरून विद्यार्थ्यांना वाचविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, पाण्याचा प्रवाह आणि खोली अधिक असल्याने तिघांनाही वाचविता आले नाही. नागरिकांच्या हाती येण्यापूर्वीच तिन्ही विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता.

मित्रपरिवारावर शोककळा

एकाच वेळी कॉलेजमधील तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या मित्रपरिवारासह संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच लोणी पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवले. या घटनेची नोंद करण्याचे काम रात्री सुरू होते. लोणी पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# थलापती विजय यांना मोठा धक्का!




## फ्लोअर टेस्टमध्ये साथ देणाऱ्या आमदारांनी पलटी मारली

गेल्या दोन आठवड्यांत तामिळनाडूच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. एआयएडीएमके पक्षात सुरू झालेले अंतर्गत बंड आता संपुष्टात येत असल्याचे दिसत आहे. पक्षाध्यक्ष ई. पलानीस्वामी यांना विरोध करणारे आणि विधानसभेतील बहुमत चाचणीत विजय विजय कुमार यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके सरकारच्या बाजूने मतदान करणारे बंडखोर आमदार आता पक्षात परतले आहेत.

शुक्रवारी दोन्ही गटांनी विधानसभा अध्यक्षांची भेट घेऊन पक्ष आता एकसंध असल्याचे आश्वासन दिले. बंडखोर आमदारांनी, आम्ही नेहमीच एकजूट राहू, असे म्हणत पक्षाशी आपली निष्ठा पुन्हा व्यक्त केली. बंडखोर आमदार परतल्यानंतर, ई. पलानीस्वामी यांनी त्यांच्या अपात्रतेची मागणी करणारी सभापती कार्यालयात दाखल केलेली याचिका मागे घेतली आहे.

वास्तविक पाहता, विश्वासदर्शक ठरावादरम्यान २५ आमदारांनी पक्षाच्या भूमिकेविरुद्ध जाऊन विजया सरकारच्या बाजूने मतदान केले होते. यानंतर, पलानीस्वामी यांनी या आमदारांच्या अपात्रतेची मागणी करत सभापतींना पत्र लिहिले होते. एआयएडीएमकेमधील हे राजकीय संकट निवडणुकीतील पराभवानंतर सुरू झाले. सी. व्ही. षण्मुगम यांच्या नेतृत्वाखाली काही आमदारांनी पलानीस्वामी यांच्या विरोधात मोहीम उघडली. बंडखोर गटाला टीव्हीके सरकारला पाठिंबा द्यायचा होता, पण पलानीस्वामी यांनी हा प्रस्ताव फेटाळला.

एस. पी. वेलुमणी यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर नेत्यांच्या एका शिष्टमंडळाने पलानीस्वामी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली आणि वाद मिटल्याची घोषणा केली. बैठकीनंतर नेत्यांनी सांगितले की, पलानीस्वामी हेच त्यांचे नेते आहेत. त्यांनी कबूल केले की, काही मतभेदांमुळे बंड झाले होते, परंतु आता सर्व प्रश्न मिटले आहेत. त्यांनी असेही सांगितले की, पलानीस्वामींनी त्यांच्या मागण्यांचा विचार करण्याचे आश्वासन दिले आहे.

# मुस्लिम समाजाने सत्ताधाऱ्यांच्या अन्यायाविरोधात एकत्र येऊन सरकारला जाब विचारावा : जरांगे पाटील

## मुस्लिम समाज एकजूट झाल्यास मी मैदानात उतरणार





गेवराई, (प्रतिनिधी) – सत्ताधाऱ्यांच्या अन्याय-अत्याचाराविरोधात देशातील व राज्यातील मुस्लिम समाजाने एकत्र येऊन सरकारला जाब विचारावा. समस्त मुस्लिम समाजाची एकजूट झाल्यास मी मुस्लिम बांधवांसोबत दंड थोपटून मैदानात उतरणार आहे, असा खणखणीत इशारा मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. जरांगे पाटील पुढे म्हणाले की, मुस्लिम बांधवांच्या गटबाजीचा व आपसातील मतभेदाचा गैरफायदा घेतला जात असून त्यांना टार्गेट केले जात आहे. सत्ताधाऱ्यांकडून कोणतेही निमित्त करून मुस्लिम समाजाला चोहोबाजूंनी घेरण्याचा प्रयत्न केला जात आहे. वरवरून एकत्र दिसणारा मुस्लिम समाज प्रत्यक्षात मैदानात उतरून एकत्र येत नसल्याने तो अन्यायाचा शिकार होत आहे. त्यामुळे भारत देशातील व विशेषतः महाराष्ट्र राज्यातील मुस्लिम समाजाने सत्ताधाऱ्यांच्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध एकत्र येऊन सरकारला जाब विचारावा. मुस्लिम समाजाची एकजूट झाल्यास कोणाचीही या समाजाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होणार नाही आणि कोणतीही शक्ती झुकल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे एक दिवस पोटापाण्याचा प्रश्न व राजकीय जोडे बाजूला सारून सर्वांनी एकत्र यावे. मुस्लिम समाजाची एकजूट झल्यास मी सुद्धा मुस्लिम समाजासोबत दंड थोपटून मैदानात उतरणार आहे, असा खणखणीत इशारा जरांगे पाटलांनी दिला.मुस्लिम समाजावर दिवसेंदिवस अन्याय अत्याचार वाढत असल्याने त्याला पायबंद करण्यासाठी अल्पसंख्याक संरक्षण कायदा करण्यात यावा, यासाठी होणा-या आंदोलनाला मराठा संघर्षयोध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांनी पाठिंबा द्यावा म्हणून प्रा.इलियास इनामदार यांच्या नेतृत्वाखालील अल्पसंख्यांक संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने बकरीदच्या दिवशी गुरुवार, दिनांक २८ मे २०२६ रोजी अंतरवाली सराटी येथे जाऊन त्यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. शासनाने अल्पसंख्याक संरक्षण कायदा करावा, या प्रमुख मागणीसाठी येत्या जुन महिन्यात मुंबई येथील आझाद मैदानावर विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्यावेळी अल्पसंख्याक संरक्षण संघर्ष समितीच्यावतीने आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाला पाठिंबा मिळावा म्हणून मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांची शिष्टमडळाने भेट घेतली व एक मोठा भाऊ म्हणून आम्हाला खंबीरपणे साथ द्यावी, अशी विंनती केली. देशात व राज्यात अल्पसंख्याक समाज व विशेषतः मुस्लिम समाजाविरोधात होणारे जातीय हल्ले, मॉब लिंचिंग, हेटस्पीच, राष्ट्रपुरुषांची, संतांची विटंबना, धार्मिक स्थळे, धर्मग्रंथ, वेशभूषा, खानपानावर होणारे हल्ले, बुलडोजर कार्यवाही सोशलमीडियाच्या माध्यमातून होणारे हल्ले रोखण्यासाठी व या हल्ल्यापासून समाजाचे संरक्षण करण्यासाठी राज्यात अल्पसंख्याक संरक्षण कायदा बनविण्याकरिता प्रा.इतिहास इनामदार यांच्या नेतृत्वाखाली अल्पसंख्यांक संघर्ष समितीच्यावतीने मुंबई येथील आझाद मैदानावर पावसाळी अधिवेशनाच्यावेळी लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे, अशी माहिती या भेटी दरम्यान शिष्टमंडळाने मनोज जरांगे पाटील यांना दिली. या आंदोलनाला जरांगे पाटलांनी आपला जाहीर पाठिंबा दर्शविला व भविष्यात मुस्लिम समाजासोबत राहुन या समाजाला न्याय मिळवून देणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.